बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १६४ वा | शनिवार दिनांक ०६ सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)
dainiklatursamachar@gmail.com

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### तुळजापूरातून मोटारसायकलची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी रमजान मकबुल सय्यद, वय ३१ वर्षे, रा.धारुर ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ३०,००० किंमतीची होंडा शाईन कंपनीची काळसर रंगाची मोटरसायकल ही दि.३०.०८.२०२५ रोजी शिंदे प्रशाला समोर पापनास तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रमजान सय्यद यांनी दि.०४.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### व्हीलच्या बेसची अज्ञाताने केली चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी महादेव पंडीत ढवन, वय ४२ वर्षे, रा.खंडाळा ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि. १७.०८.२०२५ रोजी सायंकाळी १७.३० वा. सु. पाडोळी इंसस्टॉवरच्या जिप पेट्रोलिंग करीता गेले असता पाडोळी इंडस्टॉवरचे अज्ञात व्यक्तीने व्हील चे बेस बॅन्ड६६३१ कार्ड अंदाजे २०,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-महादेव ढवन यांनी दि.०४.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिवातून मोटारसायकलची चोरी


धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- सचिन बाबु राठोड, वय २९ वर्षे, रा.रामतिर्थ ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ७०,००० किंमतीची होंडा युनिकॉर्न कंपनीची मोटरसायकल ही दि.२१.०८.२०२५ रोजी बाळासाहेब ठाकरे नगर धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सचिन राठोड यांनी दि.०३.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### गंभीर जखमी केले

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, अभिषेक उत्तम घुगे, महेश उध्दव घुगे, नंदुबाई उत्तम घुगे, मंगल उध्दव घुगे, सर्व रा. अणदुर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी अणदुर शिवारातील शेतात फिर्यादी प्रदिप शिवाजी घुगे, वय ५० वर्षे, रा.अणदुर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांना नमुदांनी जमीनीच्या वादाचे कारणावरुन जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, दगडाने मारहाण करुन गंभीर जखमी केले.

अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रदिप घुगे यांनी दि.०४.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे नळदुर्ग येथे भा.न्या. सं.कलम १०९, ११५(२), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत देणार; बाधित क्षेत्राचे पंचनामे अंतिम टप्प्यात- कृषी मंत्री दत्तात्रय भरणे



मुंबई, - गेल्या काही दिवसांपासून राज्यात पुन्हा एकदा मॉन्सून सक्रिय झाल्याने अनेक जिल्ह्यांना पावसाचा फटका बसत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निर्देशानुसार बाधित भागात सुरु केलेले पंचनाम्याचे काम अंतिम टप्यात असून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यात येईल. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. शेतकरी बांधवांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

अतिवृष्टीमुळे राज्यातील २९ जिल्ह्यांतील १९१ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४ पेक्षा जास्त महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे नुकसान झाले आहे.राज्यात १४ लाख ४४ हजार ७४९ हेक्टर क्षेत्र (३६, ११, ८७२.५ एकर) बाधित झाले आहे. त्यापैकी १० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र बाधित असलेले १२ जिल्हे आहेत. यामध्ये दि.१५ ते २० ऑगस्ट दरम्यान पडलेल्या सर्वाधिक पावसामुळे शेती पिकांचे जास्त नुकसान झाले आहे.

सर्वाधिक बाधित जिल्हे : नांदेड - ६,२०,५६६ हेक्टर,वाशीम - १,६४,५५७ हेक्टर, यवतमाळ - १,६४,९३२ हेक्टर, धाराशिव - १५०,७५३,बुलढाणा - ८९,७८२ हेक्टर,अकोला - ४३,८२८ हेक्टर,सोलापूर - ४७,२६६ हेक्टर,हिंगोली - ४०,००० हेक्टर क्षेत्रामध्ये बाधित पिके सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद या पिकांनाही फटका बसला आहे.एकूण बाधित जिल्हे नांदेड, वाशीम, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, सोलापूर, हिंगोली, धाराशिव, परभणी,अमरावती, जळगाव, वर्धा, सांगली, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धुळे, जळगाव, रत्नागिरी, चंद्रपूर, सातारा, नाशिक, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, गडचिरोली, रायगड व नागपूर.

# दरोडा जबरी चोरी घरफोडी या सारखे गुन्हे करणाऱ्या टोळी सदस्यावर गुन्हा दाखल


धाराशिव (प्रतिनिधी)- परंडा पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, धनाजी झकीऱ्या पवार, वय ३९ वर्षे, रा. बोंबाळे ता. खटाव जि. सातारा हा दरोडेखोराच्या टोळीचा सदस्य असल्याचे निदर्शनास आल्याने नमुद आरोपी विरुध्द पोलीस ठाणे वडुज,गुरुन २३३/२२ कलम ३९५, ४२० भादवी पोस्टे विटा ७४/१४ कलम ४५७,३८०, ५११, ३४ सह मोक्का कायदा भादंवि, पोस्टे आपाडी ६२/१४ कलम ३९५, ४११ भादवी, ९५/१४ कलम ३९२,३४ भादवि अन्वये गुन्हे नोदं असुन नमुद आरोपी दरोडा, जबरी चोरी, घरफोडी चोरी या सारख्या गुन्हा करण्याची शक्यता असल्याने त्यास ताब्यात घेवून फिर्यादी शिवकुमार धर्मराज घोळवे, वय ३९ वर्षे, नेमणुक परंडा पोलीस ठाणे यांनी दि.०४.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे परंडा येथे भा.न्या.सं.कलम ३१३ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत गुंडु तुगाव ता. उमरगा जि. धाराशिव,मनोज रा. अचलेर ता. उमरगा जि. धाराशिव,नामदेव व्यंकट रा. मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव, रफीक , रा.दाळिंब ता. उमरगा जि. धाराशिव, बालाजी रा. जेवळी ता. लोहारा जि. धाराशिव, महेबुब , रा. लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव, राजेश, रा. दस्तापुर ता. लोहारा जि. धाराशिव यांनी दि.०४.०९.२०२५ रोजी १२.००ते १४.३० वा. सु. आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे ॲपे रिक्षा क्र एमएच २३ एन १२४८,पे रिक्षा क्र एमएच २५ एम १५४७, पे रिक्षा क्र एमएच२५ ई ९५८४, अूपे रिक्षा क्र एमएच २५ एन ११२५,पे रिक्षा क्र एमएच२३ एक्स ४३२८, ॲपे रिक्षा, पे रिक्षा क्र ०५ बी.जी. १०४६ ही वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौक ते आष्टामोड चौकात रोडवर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना मुरुम पोलीसांना मिळून आले.

यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये मुरुम पो. ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

# आदर्श महाविद्यालय उमरगा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागच्यावतीने शिक्षक दिन साजरा



मुरूम (सुधीर पंचगल्ले)- आदर्श महाविद्यालय उमरगा येथे पाच सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राम सोलंकर सर,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य माळगे सर, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. मेनकुदळे सर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. तात्याराव चव्हाण, डॉ.फुलचंद पवार प्रा.जोजन रवींद्र यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. राम सोलंकर यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा गौरव केला आणि शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनी केलेल्या त्यागामुळे आणि समर्पणामुळेच आज आपण आपल्या जीवनात यशस्वी होऊ शकतो असे ते म्हणाले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. धनंजय मेनकुदळे यांनी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश कसा निर्माण केला आहे हे त्यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केले. कार्यक्रमाचे संचलन प्रा. तात्याराव चव्हाण यांनी केले व आभार प्रा. फुलचंद पवार यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमासाठी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुगांव शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने शिक्षक दिन उत्साहात संपन्न




धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव तालुक्यातील तुगांव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तुगांव येथे शिक्षक दिन मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. प्रथम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिक्षक दिना निमित्त शाळा शालेय व्यवस्थापन समिती, तुगांव यांच्या वतीने शाळेतील मुख्याध्यापक प्रमोद अनपट,सहशिक्षक शिवदास चौगुले, नवनाथ बचाटे,बाहुबली नवले,सलभकुमार भगत, दत्तात्रय पडवळ, नामदेव डुकरे,अमोल वैद्य, व तुगांव गावातील मार्गदर्शक शिक्षक दत्ता हाजगुडे पाटील, निशिकांत पाटील, मंदाकिनी भुतेकर मॅडम या शिक्षकांचा पुष्पगुछ देऊन त्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष, दिलीप अण्णा शेंडगे, प्रमुख उपस्थिती भाजपा तालुकाध्यक्ष अनिल भाऊ भुतेकर, पोलीस पाटील तुगांव श्रुतिका हाजगुडे,भाजपा तालुका चिटणीस सचिन लोमटे, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा प्रीती हाजगुडे, सदस्य संगिता भुतेकर, मिरा शितोळे, समाधान पाटील व उमेद प्रभाग संघाच्या मॅनेजर रुपाली शेंडगे,सी.आर. पी. सुजाताताई मोरे, ग्रामसेवक नलावडे साहेब गावातील शिक्षक प्रेमी नागरिक, नेताजी मोरे, विकास शेंडगे सर, अशोक गडकर, बालाजी शितोळे, युवक संतोष हाजगुडे, अक्षय शेंडगे उपस्थित होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन सचिन लोमटे यांनी केले तर उपस्थितांचे आभार शिवदास चौगुले सर यांनी मानले यावेळी विद्यार्थी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री कुलस्वामिनी आश्रमशाळेत शिक्षक दिन साजरा



जळकोट (विजय पिसे)- ५ सप्टेंबर २०२५ वार शुक्रवार रोजी श्री कुलस्वामिनी प्राथमिक, माध्यमिक व राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय जळकोट येथे डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोटचे सचिव तथा प्राचार्य संतोष चव्हाण साहेब प्रमुख अतिथी श्री कुलस्वामिनी प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका आशा पवार मॅडम व इंदिरा गांधी आदर्श माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक विनायक राठोड सर,इंदिरा गांधी आदर्श माध्यमिक आश्रम शाळेचे सहशिक्षक उमाकांत माळी सर श्री कुलस्वामिनी माध्यमिक आश्रम शाळेचे ज्येष्ठ शिक्षक नागेंद्र गुरव सर उपस्थित होते.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोटच्या वतीने संस्थेचे सचिव आदरणीय संतोष चव्हाण साहेब यांनी सर्व शिक्षकांचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. १९९८ च्या इयत्ता दहावीच्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व शिक्षकांचा फेटा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक देवानंद पांढरे सरांनी केले.विद्यालयातील विद्यार्थी शिक्षका बद्दल आपल्या भावना व्यक्त केले या कार्यक्रमात माजी विद्यार्थी अनिल चव्हाण, उमाकांत माळी, मुख्याध्यापक विनायक राठोड सर, तसेच प्राचार्य संतोष चव्हाण साहेब यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले.

यावेळी प्राथमिक आश्रम शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्रीमती शांताबाई चौगुले मॅडम, श्रीमती मिरा पवार मॅडम, महाविद्यालयाचे प्रा ज्योतिका चव्हाण मॅडम, प्रा सुरेश कोकाटे सर, प्रा अश्विनी लबडे ,प्रा संतोष दुधभाते सर ,प्रा अप्पासाहेब साबळे सर, माध्यमिक आश्रम शाळेचे सहशिक्षक बिळेणसिध्द हक्के सर, बाळासाहेब मुखम सर,कल्पना लवंद मॅडम, कुमारी मयुरी कांबळे मॅडम, ,दुर्गेश कदम सर,शंकर चव्हाण, अमित खारे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन देवानंद पांढरे सर श्री खंडेराव कारले सर व श्रीमती प्रा प्रमिला कुंचगे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी नेहा राठोड व कुमारी मोनिका चव्हाण तर आभार किरण कांबळे सरांनी मानले. या कार्यक्रमाला अलियाबाद तांडा रामतीर्थ तांडा येथील माजी विद्यार्थी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# आत्मनिर्भरतेकडे वाटचाल - बेंबळीमध्ये १५१ महिलांना शिलाई मशीन वाटप



बेंबळी (प्रतिनिधी)- श्री. लक्ष्मी बहुउद्देशीय सामाजिक सेवाभावी संस्था, बेंबळी यांच्या वतीने गरजू महिलांना आत्मनिर्भर करण्याच्या उद्देशाने १५१ शिलाई मशीनचे टप्प्याटप्प्याने वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून नंदकुमार मानाळे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्या भाजप नेत्या विद्या माने, अमृता रणदिवे, सुलक्षणा उपाशे व संस्थेच्या सचिव साधना मानाळे यांनी उपस्थित राहून महिलांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना संदश भारती मानाळे म्हणाले की, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि महिलांना स्वावलंबी बनवणे हाच या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. महिलांनी शिवणकाम शिकून कपडे, पिशव्या तयार करून शाश्वत उत्पन्नाचे साधन निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या उपक्रमामुळे परिसरातील महिलांना आत्मनिर्भरतेची नवी दिशा मिळाली असून उज्ज्वल भवितव्य घडवण्याचा आत्मविश्वास लाभला आहे.

सुनिता तानवडे, अंजना महामुनी, प्रगती दूधभाते, अनीता तानवडे, सुनंदा डावकरे, प्रतीक्षा सोनटक्के, कांता खराडे, अनीता करजखेडे, ललिता वाघमारे, ऋतुजा गुरव, सुमन भोरे, अर्चना राऊत, इंदुबाई भिसे, सोनाली रोकडे आदींसह सर्व १५१ महिलांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

ओश्म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## वृक्ष तोड आणि महापूराचे संकट

पंजाब, हिमाचलसह अनेक राज्यांमध्ये भीषण पूर आणि भूस्खलनाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी कडक टिप्पणी केली. बेकायदेशीर वृक्षतोडीमुळे आपत्ती निर्माण झाल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. शिवाय केंद्र सरकार, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (एनडीएमए), एनएचएआय आणि हिमाचल, पंजाब, उत्तराखंड आणि जम्मू आणि काश्मीर राज्यांना नोटीस बजावली आहे. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्यायमूर्ती के. विनोदचंद्रन यांच्या खंडपीठाने सांगितले की, विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखले पाहिजे. उत्तराखंड, हिमाचल,पंजाबमध्ये भूस्खलन तसेच पूर पाहिले. त्यात मोठ्या प्रमाणात लाकूड वाहून गेले. पहिल्या दृष्टिक्षेपात हे बेकायदा वृक्षतोडीचे संकेत आहेत. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले, ‘निसर्गाचा खेळखंडोबा केला. आता तो प्रत्युत्तर देत आहे. हिमाचल मध्ये पुन्हा भूस्खलनात १० जण गाढले गेले आहेत. गुरुवारी सकाळी हिमाचलमधील कुल्लूच्या मठ परिसरात भूस्खलन झाल्याने १० जण ढिगाऱ्याखाली गाढले गेले. त्यापैकी एकाचा मृतदेह सापडला. दिल्लीतील यमुनेची पाण्याची पातळी धोक्याच्या पातळीपेक्षा जास्त होती. यमुना बाजार आणि मयूर विहार फेज-१ भागातील मदत छावण्याही पाण्याखाली गेल्याने पीडितांना पुन्हा वाचवण्यात आले. हिमाचल,पंजाबमध्ये भूस्खलन तसेच पूर पाहिले. त्यात मोठ्या प्रमाणात लाकूड वाहून गेले. पहिल्या दृष्टिक्षेपात हे बेकायदा वृक्षतोडीचे संकेत आहेत. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले, ‘निसर्गाचा खेळखंडोबा केला. आता तो प्रत्युत्तर देत आहे. झाडतोड आणि पावसाचे संकट मानवाचा विकास प्रवास हजारो वर्षांपासून चालू आहे. शिकार, शेती, उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान या सर्व प्रवासामध्ये निसर्गाने मानवाला सर्वकाही दिले. नद्या, डोंगर, जंगल, झाडे, पाऊस हेच मानवाच्या अस्तित्वाचे मूळ होते. पण जसजशी मानवाची लोकसंख्या वाढू लागली, तसतसे जंगलाचा ऱ्हास, झाडतोड, औद्योगिकरण आणि शहरीकरण वेगाने वाढू लागले. परिणामी आज आपण पावसाचे संकट या गंभीर समस्येला सामोरे जात आहोत. झाडांचे महत्त्व झाडे ही निसर्गाची जीवनरेखा आहेत. झाडे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून प्राणवायू देतात. पाऊस पाडण्यासाठी झाडांची मोठी भूमिका असते. जमिनीची धूप रोखणे, भूगर्भातील पाणी साठवणे, हवामान संतुलित ठेवणे हे काम झाडे करतात. पक्षी, प्राणी, कीटक यांचे नैसर्गिक निवासस्थान म्हणजे जंगल. झाडे नसतील तर निसर्गाचेसंतुलन बिघडते, हवामान बदलते आणि दुष्काळ, पूर, तापमानवाढ यांसारख्या समस्या वाढतात. झाडतोडीची कारणे शहरीकरण व औद्योगिकरण, शहरांचा विस्तार, रस्ते, रेल्वे मार्ग, कारखाने यासाठी झाडांची मोठ्या प्रमाणावर कत्तल केली जाते. शेतीसाठी जंगलतोड तसेच लोकसंख्या वाढल्यामुळे शेतीसाठी जमीन मिळवण्यासाठी जंगलांचा नाश केला जातो. लाकूड उद्योगात फर्निचर, घरबांधणी, कागद उद्योगासाठी मोठ्या प्रमाणात झाडांची तोड केली जाते. खनिज उत्खनन व खनिज, कोळसा, पेट्रोलियम मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जंगल साफ केले जाते. नियमांचा अभाव आणि भ्रष्टाचारात अनेकदा पर्यावरणीय नियम पाळले जात नाहीत किंवा दुर्लक्ष केले जाते. झाडतोडीचे परिणाम पावसाचे प्रमाण घटते आहे. झाडे नसल्यामुळे ढगांचे संघटन कमी होते. दुष्काळ आणि पाणीटंचाईचा परिणाम, पाऊसकमी पडल्याने पाण्याचे स्रोत आटतात. पूर आणि मृदा धूप - झाडे नसल्याने पाणी वाहून जाते आणि पूरस्थिती निर्माण होते. जैवविविधतेचा नाश - प्राणी, पक्षी यांचे अधिवास नाहीसे होतात. हवामान बदल - तापमानवाढ, उष्णतेच्या लाटा, अनियमित पाऊस याचे थेट कारण जंगलतोड आहे. पावसाचे संकट आज महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात पावसाचे संकट गंभीर बनले आहे. अनियमित पाऊस तर काही ठिकाणी मुसळधार पाऊस काही ठिकाणी दुष्काळ. कमी सरासरी पाऊस पूर्वीपेक्षा पावसाचे प्रमाण घटले आहे.जमिनीखालचे पाणी आटणे विहिरी, बोअरवेल्स कोरड्या पडतात. शेतीचे नुकसान शेतकऱ्यांची पिके वाया जातात, शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढतात. झाडतोड आणि पावसाचे संकट यांचा संबंध झाडे वातावरणातील पाण्याचे वाफेत रूपांतर करून ढग तयार होण्यास मदत करतात. जंगलांमध्ये ओलावा टिकून राहतो, त्यामुळे ढग तेथे आकर्षित होतात. पण जेव्हा मोठ्या प्रमाणावर झाडतोड होते, तेव्हा ढग तयार होत नाहीत, पाऊस कमी पडतो आणि हवामान कोरडे पडते. त्यामुळे झाडतोड थेट पावसाच्या संकटाला कारणीभूत ठरते. उदाहरणे अमेझॉनचे जंगलाला पृथ्वीची फुफ्फुसे म्हणतात. येथे मोठ्या प्रमाणावर झाडतोड झाल्याने जागतिक हवामानावर परिणाम होत आहे. सहाराचे वाळवंटात हजारो वर्षांपूर्वी येथे हिरवीगार जंगले होती, पण झाडतोड व हवामान बदलामुळे ते वाळवंट झाले. महाराष्ट्रातील मराठवाड्यात दरवर्षी पावसाचे प्रमाण घटत आहे, कारण जंगलतोड मोठ्या प्रमाणावर झाली आहे. उपाययोजना वृक्षारोपण मोहीम ही प्रत्येकाने झाडे लावणे व ती जगवणे हे कर्तव्य समजावे. वनसंवर्धन - जंगलातील अवैध तोड थांबवून वनक्षेत्र वाढवावे. पाणी व्यवस्थापन, जलसंधारण, बंधारे, पाणी अडवा-पाणी जिरवा योजना राबवाव्यात. सौरऊर्जा व हरित तंत्रज्ञान पर्यावरणपूरक उद्योग, कमी प्रदूषणकारी साधनांचा वापर वाढवावा. जनजागृती, शाळा, महाविद्यालये, ग्रामस्तरावर पर्यावरणाबाबत जनजागृती करावी. कायदे कडक करणे - झाडतोडीवर कठोर कारवाई करावी. निष्कर्ष झाडतोड आणि पावसाचे संकट हे एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत. झाडे हा निसर्गाचा श्वास आहे आणि पाऊस ही त्याची प्राणवायू प्रणाली आहे. जर आपण झाडे नष्ट केली तर पावसाचे संकट टाळता येणार नाही. म्हणूनच एक झाड म्हणजे एक आयुष्य ही जाणीव मनात ठेवून प्रत्येकाने पर्यावरण संवर्धनात हातभार लावणे गरजेचे आहे. वृक्षतोड सक्तीने थांबविले पाहिजे.

# फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी आरोग्य सेवा हीच ईश्वरसेवा समजुन कार्य करावे : डॉ. सौताडेकर

## आलमला फार्मसी महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न

**औसा/प्रतिनिधी :** तालुक्यातील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी व दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेज आलमला येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने आयोजित करण्यात आलेल्या शैक्षणिक क्रिडा स्पर्धा, संशोधन स्पर्धा परीक्षा व सांस्कृतीक कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुणे डॉ. विवेक सौताडेकर,जिल्हा समन्वयक,समग्र शिक्षा, शिक्षण विभाग,जिल्हा परिषद, लातूर व संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे यांच्या शुभहस्ते दि. ४ सप्टेंबर, २०२५ वार गुरुवार रोजी सकाळी ११:०० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये सत्कार समारंभ संपन्न झाला.

सदरील सत्कार सोहळयास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. कैलास कापसे, प्रा. दिनेश गुजराथी, विभाग प्रमुख डॉ. समीर शफी इत्यादी मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ विश्वेश्वर धाराशिवे यांनी फार्मसीचे विद्यार्थी रुग्णांची आरोग्य सेवा हीच ईश्वरसेवा समजून कार्य करीत आहेत हे पाहुन आनंद होत आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात त्यांच्या पालकांचा मौलाचा वाटा असतो याची जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवावी असे सांगून विद्यार्थ्यांचा ना शुभेच्छा दिल्या.




प्रमुख पाहुणे डॉ. विवेक सौताडेकर यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी स्वप्न पाहताना मोठी पहावी आणि ते प्राप्त करण्यासाठी अहोरात्र अभ्यास करावा व फार्मसी शिक्षणाचा उपयोग समाजसेवेसाठी करावे. आजच्या स्पर्धेच्या युगात संधी सहाजासहज प्राप्त होत नाही ती प्राप्त करण्यासाठी सतत ध्यास घेतला पाहिजे परीस्थितीशी लढा देऊन शिक्षण घेऊन यशस्वी व्हावे आणि यशस्वी होण्यासाठी गरीबी कधीही अडथळा होऊ शकत नसल्याचे सांगून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले.

सदरील सत्कार सोहळयात जीपॅट व नाईपर सारख्या स्पर्धा परीक्षेत मानांकन प्राप्त विद्यार्थी विशाल सुर्यवशी, सौरव सिंग, बागवान मुस्कान, जाधव वैष्णवी, तपासे दिव्या या विद्यार्थ्यांना रोख रक्कम पाच हजार व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

शेख सुरज चाँदपाशा, पाटील चैतन्या पाडूरंग, दिक्षीत खुशी सतिशसिंग, जाधव सागर प्रमोद, चामवाड तनुजा बालाजी, जाधव राधा वशिष्ठ, कदम निकीता सहदेव, गौंड परीजा संगमेश्वर, पठाण सोफिया मुख्तार, शेख मुस्कान सुल्तान, पठाण अतिका लतिफ, धानुरे भक्ती बसवराज, व्यास उन्नती दिनेश, सौरव सिंग, टेकुळे मुक्ता भरत, पटमास अश्विनी रामेश्वर, आलमले वैष्णवी उन्केश्वर, शेख मंसलवा अब्दुलसाजीद, शेख मसीरा रफिक, चव्हाण सानिका अक्रुर, चालक अनुजा चंद्रकांत, कोठारी निशा महेंद्र, बाजपायी रीतु संतोष, वाघमारे गायत्री प्रदीपकुमार, गबाळे वैभव नारायण, चौरडिया दिव्या रमेश, कदम आकांक्षा श्रीरंग, काबरा विनय श्रीराम, जाधव आकांक्षा बाळासाहेब, बोडके पृथ्वी रवि, चामे गजाजन बाबुराव, पटेल फिजा सालार, भेंडे सुशांत संजय,फिरदोस कुरेशी, राऊत त्रिनेत्र अनिल, हातझाडे आंचल रामकृष्ण, गजगे सुषमा, पवार श्रध्दा राजाभाऊ, गरड ज्ञानेश्वरी, हाऊळ सृष्टी, शेख साजिद, साधना पिटले, सफिना सय्यद, तहनियत सय्यद, कांबळे पल्लवी, राठोड कोमल, मोरे वैष्णवी इत्यादी बी. फार्मसी, फार्म. डी, एम. फार्मसी व डी. फार्मसीच्या अभ्यासक्रमाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच विविध क्षेत्रात क्रिडा, स्पर्धा परीक्षा व सांस्कृतीक स्पर्धामध्ये उत्कृष्ट कामगिरी करुन महाविद्यालयाचे नावलौकिक केलेले ऋषीकेश भोसले, जावळेकर गणेश, चव्हाण रीतेश, पाटील साक्षी, सय्यद रीयान, रुतुजा बेंबडे, अमित भदरगे, सरस्वती मोटे या विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मुस्कान शेख व सोफिया पठाण यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. कैलास कापसे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परीश्रम घेतले.

# दयानंद कला महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. संदीपान जगदाळे राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ ने सन्मानित

## शिक्षकांचे योगदान भारताला सुपर पॉवर बनवेल - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

**नवी दिल्ली/लातूर :** शिक्षकांचे समाजातील स्थान सर्वोच्च असून शिक्षक मुलांमध्ये आत्मसन्मान आणि सुरक्षितता जागवतात. त्यांचे यश हेच शिक्षकांचे खरे बक्षीस आहे. राष्ट्रीय शिक्षा धोरण २०२० च्या अंमलबजावणीत शिक्षणाला आनंददायी बनवण्यावर भर देत बालिका शिक्षणाला प्राधान्य देण्यात येत आहे. ‘‘भारताला कौशल्याची राजधानी आणि सुपर पॉवर बनवण्यात शिक्षकांची भूमिका निर्णायक आहे,’’ असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी केले.

शिक्षक दिनानिमित्त विज्ञान भवन येथे आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते महाराष्ट्रातील सहा शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यामध्ये शालेय शिक्षण क्षेत्रातील डॉ. शेख मोहम्मद वक़िउद्दीन शेख हमीदोद्दीन (जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धापूर, नांदेड), सोनिया विकास कपूर (एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २, मुंबई) आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे (दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स, लातूर), डॉ. नीलाक्षी जैन (शाह अँन्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई), प्रा. पुरुषोत्तम पवार (एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंग, बारामती), आणि कौशल्य विकास क्षेत्रातील श्री. अनिल रामदास जिभकाटे (संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर) यांचा समावेश आहे.

शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागातर्फे आयोजित या सोहळ्यात ४५ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण आणि १६ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुकांत मजूमदार, जयंत चौधरी, शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे सचिव देबाश्री मुखर्जी यावेळी उपस्थित होते.



या पुरस्काराचा उद्देश शिक्षकांचे समर्पण, नाविन्यपूर्ण कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा गौरव करणे हा आहे. मागील काही वर्षांपासून या पुरस्काराची व्याप्ती वाढवून उच्च शिक्षण तसेच कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयातील शिक्षकांनाही संधी देण्यात येत आहे.

**दयानंद कला महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे यांच्याविषयी संक्षिप्त माहिती**

संगीत विषयाचे प्राध्यापक असलेले डॉ. जगदाळे हे लातूरमधील पहिले राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेते ठरले. तबलावादक आणि गायक म्हणून प्रसिद्ध असलेल्या जगदाळे यांनी गोंड आदिवासी वस्त्यांवर शिक्षण पोहोचवले, एचआयव्ही बाधित व अनाथ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले.

अंध विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपीतील संगीत पुस्तक तयार करणे हे त्यांचे विशेष योगदान आहे. कोविड काळात दूरदर्शन, रेडिओ आणि सोशल मीडियाद्वारे त्यांनी लोकगीते व पोवाड्यांच्या माध्यमातून जनजागृती केली. त्यांच्या लिखाणातील १३ संगीतग्रंथ परदेशातही प्रसिद्ध झाले आहेत.

या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांना प्रमाणपत्र, रौप्य पदक आणि ५० हजार रुपयांचे रोख बक्षीस प्रदान केले.

## ...म्हणून एअर इंडियाच्या १६१ प्रवासी असलेल्या विमानाचे तातडीने लँडिंग

इंदूर : एअर इंडियाच्या इंदूर - दिल्ली विमानाने दिल्लीच्या दिशेने प्रवास सुरू केला. उड्डाण करुन विमान दिल्लीच्या दिशेने झेपावले आणि धक्कादायक घटना घडली. विमानाचे एक इंजिन बंद पडले. ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी १६१ प्रवासी असलेले एअर इंडियाचे विमान आकाशात होते. पुढील संकट टाळण्यासाठी मार्ग बदलून तातडीने हे विमान इंदूर विमानतळावर उतरवण्यात आले. विमान व्यवस्थित उतरले आणि पुढचे संकट टळले. सर्व प्रवासी सुरक्षित आहेत. विमानाचे बंद पडलेले इंजिन दुरुस्त करण्याचे काम तंत्रज्ञ करत आहेत.

एअर इंडिया एक्सप्रेस ‘अँ १०२८ विमानाच्या वैमानिकाने एक इंजिन बंद पडल्याचे नियंत्रण कक्षाला कळवले. माहिती मिळताच अग्निशमन दल, रुग्णवाहिका आणि सीआयएसएफ पथकाने विमानतळावर धाव घेतली. सुदैवाने, विमान विमानतळावर सुरक्षितपणे उतरवण्यात आले.

याआधी १२ जून २०२५ रोजी गुजरातमध्ये अहमदाबाद येथे एअर इंडियाच्या बोईंग ७८७ - ८ ड्रीमलायनर विमानाचा अपघात झाला होता. सर्व इंजिन बंद पडल्यामुळे उड्डाण केल्यानंतर अवघ्या काही सेकंदात एअर इंडियाचे विमान एका इमारतीला धडक दिल्यानंतर मेडिकल हॉस्टेलवर कोसळले होते. या दुर्घटनेत एकूण २६० जणांचा मृत्यू झाला आणि ६८ जण जखमी झाले होते.

# रस्ता सुरक्षा जनजागृतीसाठी वसुंधरा वृक्षरुपी गणेश मंडळाचे पथनाट्य

## अपघात टाळण्यासाठी समाजात प्रबोधनाची गरज, तरच सुरक्षित भविष्य

**लातूर/प्रतिनिधी :** वाहतूक नियमांचे उल्लंघन, बेदरकार ड्रायव्हिंग आणि वाहतुकीची वाढती गर्दी यामुळे रस्ते अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर लातूर येथील वसुंधरा वृक्षरुपी गणेश मंडळाने एक वेगळा उपक्रम हाती घेत, रस्ता सुरक्षेच्या जनजागृतीसाठी प्रभावी पथनाट्य सादर केले.

शहरातील प्रमुख चौकांत, सार्वजनिक ठिकाणी आणि शाळा-कॉलेज परिसरात हे पथनाट्य सादर होत असून नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. ‘‘अपघात टाळूया, जीवन वाचवूया‘‘, ‘‘हेल्मेट वापरा, सीट बेल्ट लावा‘‘ यासारख्या घोषवाक्यांद्वारे मंडळाने रस्ता सुरक्षेचा गंभीर संदेश प्रभावीपणे पोहोचवला आहे.

**पथनाट्यातून मिळतोय थेट संदेश**

वसुंधरा मंडळाचे कार्यकर्ते स्थानिक कलाकारांसह या पथनाट्यात सहभाग घेत असून, वास्तवदर्शी घटनांवर आधारित प्रसंगातून प्रेक्षकांच्या मनावर ठसठशीत परिणाम होत आहे. विशेषतः तरुण वर्गाला अपघातांमागची कारणं आणि त्याचे गंभीर परिणाम समजावून सांगण्यात हे पथनाट्य यशस्वी ठरत आहे.




**अपघात रोखण्यासाठी उपाययोजना गरजेच्या**

लातूर जिल्ह्यात मागील काही वर्षांपासून अपघातांचे प्रमाण चिंताजनक आहे. यामध्ये युवकांचा सर्वाधिक बळी जात असून, रस्ते सुरक्षेबाबत असलेली बेफिकिरी ही प्रमुख कारणे आहे. अशा स्थितीत, अशा पथनाट्यांमधून केवळ जनजागृती नव्हे तर स्थानिक प्रशासन व पोलिसांनीही ठोस उपाययोजना राबवण्याची गरज असल्याचे नागरिक सांगत आहेत.

**सामाजिक भान ठेवणारे गणेश मंडळ**

वसुंधरा वृक्षरुपी गणेश मंडळ हे दरवर्षी सामाजिक संदेश देणाऱ्या उपक्रमांसाठी ओळखले जाते. पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, महिला सक्षमीकरण अशा विविध विषयांवर त्यांनी जनतेत जनजागृती केली आहे. यंदा रस्ता सुरक्षा ही अत्यंत आवश्यक बाब हेरून त्यांनी हा उपक्रम राबवला.

# त्वचेसाठी वरदान आहे आवळा, दररोज खाल्ल्याने मिळतील हे फायदे

मुंबई : आवळा हे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर फळ मानले जाते. 'सुपरफूड' म्हणून ओळखला जाणारा आवळा केवळ शरीरातील विविध समस्यांवरच नव्हे, तर तुमच्या त्वचेसाठीही एक वरदान ठरू शकतो. दररोज आवळ्याचे सेवन केल्यास तुम्हाला चमकदार आणि निरोगी त्वचा मिळू शकते.

१. त्वचेची चमक वाढवते आवळा
व्हिटॅमिन सी (तळींराळप ३) चा एक उत्तम स्रोत आहे, जो त्वचेसाठी अत्यंत महत्त्वाचे अँटीऑक्सिडंट आहे. व्हिटॅमिन सी त्वचेतील कोलेजन उत्पादन वाढवते, ज्यामुळे त्वचा अधिक चमकदार आणि टवटवीत दिसते. नियमित आवळा सेवन केल्याने त्वचेची नैसर्गिक चमक वाढते.



२. मुरुम आणि डाग कमी करते
आवळा त्याच्या अँटीबॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्मांसाठी ओळखला जातो. यामुळे मुरुमे, फोड आणि त्वचेवरील डाग कमी होण्यास मदत होते. आवळ्यातील हे गुणधर्म त्वचेला आतून स्वच्छ करतात आणि त्वचेच्या समस्यांपासून मुक्ती देतात.

३. वृद्धत्वाची लक्षणे कमी करते
आवळ्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स फ्री रॅडिकल्समुळे होणारे त्वचेचे नुकसान कमी करतात. यामुळे त्वचेवरील सुरकुत्या (थीळपज्ञश्रशी), बारीक रेषा आणि वाढत्या वयाची इतर लक्षणे कमी होण्यास मदत होते. आवळा त्वचेला तरुण आणि घट्ट ठेवण्यास मदत करतो.

४. त्वचेला डिटॉक्स करते आवळा शरीरातील विषारी पदार्थ (ढेळपी) बाहेर काढण्यास मदत करतो, ज्यामुळे रक्त शुद्ध होते. रक्तातील अशुद्धी दूर झाल्यामुळे त्वचेची गुणवत्ता सुधारते आणि त्वचा निरोगी दिसू लागते.

५. त्वचेची आर्द्रता टिकवते आवळा त्वचेला आतून हायड्रेटेड (कूवीरींशव) ठेवण्यास मदत करतो. यामुळे त्वचा कोरडी पडत नाही आणि तिची लवचिकता (एश्रीींळलळीं) टिकून राहते. आवळ्याचे सेवन कसे कराल? तुम्ही आवळा ज्यूस, आवळा पावडर, आवळ्याचा मुरंबा किंवा ताजा आवळा थेट खाऊ शकता. दररोज सकाळी रिकाम्या पोटी आवळा ज्यूस पिणे त्वचेसाठी अधिक फायदेशीर मानले जाते.

यामुळे, चमकदार आणि निरोगी त्वचेसाठी तुमच्या दैनंदिन आहारात आवळ्याचा समावेश करणे नक्कीच फायदेशीर ठरू शकते.

# बाळगा सकारात्मक दृष्टिकोन



यश-अपयश हा जीवनाचा घटनक्रम आहे. यश म्हणजे योगायोग नव्हे. तो दृष्टिकोनाचा परिणाम आहे. नीतीपूर्वक चालल्यानंतरच खरे यश मिळते. यश म्हणजे काही रहस्य नाही तर काही आधारभूत नियमांचे सातत्याने पालन केल्याचा तो सुखद परिणाम आहे.प्रसिध्द विचारवंत अर्ल नाईटिंगेलच्या मते, मूल्यवान लक्ष्याची सतत प्राप्ती होणे म्हणजेच यश होय. ध्येय किंवा लक्ष्य प्राप्तीनंतर थांबणे म्हणजे यशाचा शेवट आहे. श्रेष्ठतेचा प्रयत्न म्हणजेच यश होय. खऱ्या यशाचे मापदंड आहेत काम योग्य प्रकारे पूर्ण करणे आणि आपले लक्ष्य प्राप्त करणे. कोणत्याही क्षेत्रात यश प्राप्त करण्यासाठी पूर्ण तयारी आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यकता आहे ती उद्देश, सिध्दांत, योजना, अभ्यास, सततचे प्रयास, धैर्य आणि अभिमान या गोष्टींची. बहाणेबाजी, संधी ओळखण्यातील अयोग्यता, भीती, अनुशासनची कमतरता, कमजोर स्वभाव, ज्ञानाचा अभाव, साहसाचा अभाव ही देखील अपयशाची कारणे आहेत. ती दूर करूनच यश प्राप्त केले जाऊ शकते. जीवनात अपयशच खरा सोबती आहे. त्याचं स्वागत केलं पाहिजे. तो नम्रता, संयम आणि धैर्याचे शिक्षण देतो. अडचणीच्या काळात साहस आणि विश्वास प्राप्त करण्यास मदत करतो. व्यक्तीने नेहमी कठीण परिस्थितीतून वर येत जगलं व जिंकले पाहिजे. इतके केल्यानंतर तुम्ही यश सहजतेने मिळवू शकता.

# उत्साहपर्वाची सांगता: गणराजाचे आज विसर्जन

लोकमान्य टिळकांनी हा उत्सव सुरू करताना त्यातून होणार्या सामाजिक ऐक्याची अपेक्षा बाळगली होती. या उत्सवातून लोकांना संघटित करून स्वातंत्र्य चळवळीची पायाभरणी टिळकांनी केली होती.

गेले दहा दिवस राज्यभर उत्साही वातावरणात सुरू असलेल्या गणेशोत्सवाची आज विसर्जन मिरवणुकीने सांगता होत आहे. कोणताही उत्सव म्हणजे केवळ धार्मिक विधी नसतो, तर लोकांना एकत्र येण्याचे, आनंद वाटून घेण्याचे आणि सामाजिक संवाद वाढवण्याचे ते एक माध्यम असते. गणेशोत्सव हा त्यातील सर्वांत लोकप्रिय आणि जनमानसात खोलवर रुजलेला उत्सव आहे. गेले दहा दिवस संपूर्ण राज्यात गणेशोत्सवाने वातावरण भारावून गेले होते. आज मात्र त्यांच्या परतीच्या प्रवासाने मनाला चुटपूट लागून राहिली आहे. गेले दहा दिवस हा उत्सव शांततेत पार पडला. आजही विसर्जनाची मिरवणूक शांततेत पार पडेल, यात शंका नाही. गेली अनेक वर्षे पुण्याची विसर्जन मिरवणूक २६ ते २८ तासापर्यंत रेंगळते. यंदा अनेक गणेशमंडळांनी मिरवणुका लवकर सुरू करण्याची आणि लवकर संपवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे मिरवणुका वेळेत संपतील अशी अपेक्षा आहे. खरेतर मिरवणूक दुसर्या दिवशी दुपारपर्यंत सुरू राहणे हे बदलत्या काळानुसार योग्य नाही. त्याचा पुण्यासारख्या शहरातील जनजीवनावरच परिणाम होतो. मुंबई-पुण्यात कामासाठी जाणारे लाखो लोक घराबाहेर पडू शकत नाहीत. शिवाय पोलिस यंत्रणेवर त्याचा ताण पडतो तो वेगळाच. या वर्षीही अर्धे रस्ते अडवणारे मंडप उभारले गेले, ध्वनिक्षेपक रात्री उशिरापर्यंत सुरू होते. मिरवणुकीत हिडीस नृत्यप्रकार चालणे हे सुसंस्कृत म्हणवल्या जाणार्या पुण्याला शोभणारे नाही. विसर्जन मिरवणूक शिस्तीने पार पाडणे ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे.


उत्सवाची उपयुक्तता
गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. दहा दिवस चालणारा हा उत्सव समाजाला धार्मिक ऊर्जेबरोबरच सामाजिक एकात्मतेचा सांस्कृतिक परंपरेचा आणि नागरी जबाबदारीचा धडा देतो. यावर्षी पुण्यातील गणेश मंडळांच्या देखाव्यामध्ये विविधता



होती. त्यातून सामाजिक समरसतेचे भान जपले गेले. सार्वजनिक गणेशोत्सव हा समाजाला एकत्र आणण्यासाठी सांस्कृतिक पूल आहे, असेच लोकमान्य टिळकांना अभिप्रेत होते. विसर्जन मिरवणुकीत सर्व जाती धर्माचे भेद विसरून लाखो लोक एकत्र येतात. त्यातून जाणारा एकात्मतेचा संदेश आजच्या राजकीय व सामाजिक विभागणीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण ठरतो. विसर्जन मिरवणूक केवळ धार्मिक विधी न राहता सामाजिक जाणीव निर्माण करणारे माध्यम ठरते. गणेशोत्सवात प्रत्यक्ष सहभागी झाल्यामुळे नियोजन, काटेकोरपणा, जनसंग्रह, काटकसर, कल्पकता, कलाकुसर, शिस्त, लोकोपयोगी कामांची जाणीव यांसारख्या गुणांचे कार्यकर्त्यांमध्ये पोषण होते. पुण्यातील गणेशमंडळांनी समाजसेवेचा वसा अखंडपणे जपला आहे. शहरातील अनेक रुग्णालये आणि समाजसेवी संस्थांना गणेश मंडळे मदत करतात. गणेशोत्सवाच्या वर्गणीतून वाचणारा पैसा समाजोपयोगी कामासाठी वापरला जावा अशी सूचना लोकमान्यांनी केली होती. उत्सवाच्या खर्चातून गिरण्या उभ्या करा, सामान्य माणसाला काम द्या, देश उभारणीस मदत करा, असे आवाहन लोकमान्य टिळकांनी ४ सप्टेंबर १९०० रोजी महात्मा फुले मंडईत केले होते. गणेशोत्सवाचे स्वदेशीकरण आणि त्यातून समाजकल्याण असा त्यांचा त्यामागील हेतू होता. गणेशोत्सवात हे मुद्दे सकारात्मक असले तरी काही आव्हाने अद्याप उभी आहेत. शाडू माती ऐवजी 'पीओपी'च्या मूर्तीचा वापर, शिसे, रासायनिक रंग यांचा वापर झालेल्या मूर्तींच्या विसर्जनातून नदी आणि तलावांत होणारे प्रदूषण, निर्माल्य, थर्माकोल आणि इतर साहित्यातून वाढणारे प्रदूषण, उत्सव काळात होणारी वाहतूक कोंडी, करोडोंच्या घरात होणारी काही मंडळांची सजावट या गंभीर मुद्द्यांचा फेरविचार होण्याची गरज आहे; परंतु पर्यावरणपूरकतेची जाणीव वाढत असून, त्यास नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे. ही या वर्षाच्या उत्सवाची जमेची बाजू म्हणावी लागेल. सामाजिक कार्यकर्त्यांनी विधायक दृष्टिकोन ठेवून आजच्या उत्सवाचे स्वरूप प्रयत्नपूर्वक बदलायला हवे. तसे झाल्यास या उत्सवाची उपयुक्तताही वाढीस लागेल.

## डॉक्टर टीप्स

### नियमित झोप आणि व्यायामाने सुधारते वैवाहिक जीवन



स्मार्टफोन आल्यापासून रात्री उशीरापर्यंत हातात फोन ठेवणार्यांची संख्या वाढत असून अनेक लोकं टीव्ही किंवा वेब सीरीज बघण्यात वेळ घालवत असतात. हे अगदी सामान्य असलं तरी याने झोपेवर परिणाम होत असल्याचं अनेक शोधात कळून आलेले आहे.

या नादात अनेक लोकं तर मध्य रात्रीपर्यंत जागे असतात. परंतू याने नात्यांवर तर परिणाम पडतच आहे पण आता आरोग्यावर देखील दुष्परिणाम दिसून येत विचार केला नसेल तर जाणून घ्या की रात्री २ किंवा ३ वाजेपर्यंत न झोपणे आपल्या आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकतं. याने डोळ्याखाली काळे वर्तुळ, अपचन, कब्ज अशा समस्या दिसून येतात.

आरोग्य तज्ज्ञांप्रमाणे एक स्वस्थ जीवन शैली एक स्वस्थ जीवनाचं नेतृत्व करते आणि या प्रक्रियेत एक स्वस्थ कुटुंब नियोजन देखील सामील आहे. म्हणून कुटुंब वाढवण्याची योजना आखत असणाऱ्या पुरुषांसाठी लवकर झोपणे आणि लवकर उठणे, **(क्रमश:)**




## विनोद

विक्रेता : एक स्कॉच माणूस आपल्या दुकानात आलाय त्याला १० पैशाचं विष हवंय! आत्महत्या करायची आहे असं म्हणतोय तो त्याला मी कसा वाचवू?
दुकानाचा मालक : त्याला विषाची किंमत १५ पैसे सांग.

## संदेश

1-5 yr Girls Love MOM,
6-15 Girls Love DAD
16-25 Girls Love ME
26-50 Girls Love HUSBAND
Ab Bachi
51-80 Girls
Tumhara B To Haq Banta H Yaar..!!

## सुविचार




झाडांची मुळे मिळेल तेथून ओलावा घेण्यासाठी धडपडत असतात. त्याचप्रमाणे ज्ञानोपासकाची दृष्टी हवी.

**- साने गुरुजी**

संस्कृत सुभाषित
**गुरू सुखाचा सागरू । गुरू प्रेमाचा आगरू ।**
**गुरू धैर्याचा डोंगरू । कदाकाळी डळमळी ना ।।**

अर्थ - प्रपंचविज्ञान हेच सत्य मानणे याला, ज्ञानेश्वर माऊली अज्ञान म्हणतात. मला म्हणजे भगवंताला सामग्र्याने जाणणे, ते खरे ज्ञान म्हणतात. हे ज्ञान जाणणे, हेच जन्माचे सार्थक, बाकी सारे निरर्थक !

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

आडवे शब्द
१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तर

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तर

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत




# सोशल मीडियावर बागी ४ ची धूम! टायगरचा तगडा कमबॅक

टायगर श्रॉफचा बहुचर्चित 'बागी ४' चित्रपट अखेर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. ट्रेलर प्रदर्शित झाल्यापासूनच सोशल मीडियावर या चित्रपटाबद्दल मोठी चर्चा रंगली होती. चित्रपटगृहात रिलीज होताच प्रेक्षकांनी आपली प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली आहे. अनेकांनी टायगर श्रॉफच्या दमदार परतीचं स्वागत करत त्याच्या अभिनयाचं कौतुक केलं आहे. तसेच संपूर्ण स्टारकास्ट आणि कथानकाला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

टायगर श्रॉफचा जबरदस्त कमबॅक

'बागी ४' प्रदर्शित झाल्यानंतर सोशल मीडियावर चाहत्यांच्या प्रतिक्रिया मोठ्या प्रमाणात उमटत आहेत. अनेकांनी टायगर श्रॉफचा हा दमदार कमबॅक असल्याचे म्हटले आहे. एका वापरकर्त्याने आपल्या द (ट्विटर) अकाऊंटवर लिहिले की, या चित्रपटाची कथा 'बागी' मालिकेतील इतर चित्रपटांपेक्षा खूपच प्रभावी आहे. पहिल्या ३० मिनिटांतले सीन तर अप्रतिम आहेत. दुसऱ्या प्रेक्षकाने कमेंटमध्ये नमूद केले की, गाणी, अ‍ॅक्शन आणि थरार - सर्व गोष्टींनी मिळून हा एक परिपूर्ण एंटरटेनमेंट पॅकेज ठरतो. तसेच आणखी एका वापरकर्त्याने टायगरच्या अभिनयाचं कौतुक करत लिहिलं की, रॉनीच्या भूमिकेतला टायगर श्रॉफचा अभिनय प्रेक्षकांना थक्क करतो. कथा इतकी रोमहर्षक आहे की तुम्हाला स्क्रीनवरून डोळे हटवता येणार नाहीत. त्यातच संजय दत्तचे पात्र चित्रपटाच्या थराराला अधिक उंचीवर नेते.

डरश्रलरीसलहर ठरक्षर : यंदा लालबागच्या राजाच्या विसर्जनासाठी गुजरातहून खास मोटराइज्ड तराफा, काय आहे वेगळेपण?

३६० अंश फिरणारा तराफा, पाण्याचे फवारे ठरणार आकर्षणाचा केंद्रबिंदू! मुंबई : राज्यातील गणेशोत्सवाचा उत्साह आता शिगेला पोहोचला असून, बाप्पाला




निरोप ...

संजय दत्तचा खतरनाक अंदाज चर्चेत

'बागी ४' मध्ये टायगर श्रॉफ प्रेमाच्या आहारी जाताना दिसतो, तर दुसरीकडे संजय दत्त खलनायकाच्या भूमिकेत संपूर्ण चित्रपटावर छाप पाडतो. त्याचा लूक आणि अभिनय या दोन्ही गोष्टींनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. सोशल मीडियावर अनेकांनी त्याच्या पात्राची प्रशंसा केली आहे. एका एक्स (ट्विटर) वापरकर्त्याने लिहिले, संजय दत्त फक्त खलनायकाची भूमिका करत नाही, तर तो प्रेक्षकांना त्याच्या रागाची तीव्रता आणि मनातील वेदना अनुभवायला लावतो. त्याचा अभिनय जादुई आहे. याशिवाय काहींनी असेही नमूद केले की, 'बागी ४' मध्ये संजय दत्तच्या अभिनयात 'वास्तव' चित्रपटातील क्रूरता आणि भावनिकतेची झलक दिसून येते, जी प्रेक्षकांना खिळवून ठेवते.

बागी ४'ची स्टारकास्ट



'बागी ४' हा टायगर श्रॉफचा दमदार 'क्शनपट असला तरी संजय दत्त या चित्रपटातील मुख्य आकर्षण ठरला आहे. त्याच्या जोडीला चित्रपटाची स्टारकास्टही तगडी असल्याने प्रेक्षकांसाठी हा चित्रपट अधिक रंगतदार ठरला आहे. या चित्रपटात माजी मिस युनिव्हर्स हरनाज कौर संधू, लोकप्रिय अभिनेत्री सोनम बाजवा, बहुप्रतिभावान अभिनेते श्रेयस तळपदे आणि दमदार परफॉर्मन्ससाठी ओळखले जाणारे सौरभ सचदेवा यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. विविध कलाकारांच्या उपस्थितीमुळे कथा अधिक प्रभावी झाली आहे. तर या चित्रपटाचे दिग्दर्शन ए. हर्ष यांनी केले असून त्यांच्या दिग्दर्शनशैलीचीही चर्चा प्रेक्षकांमध्ये रंगली आहे.

## सूर्यवंशी फेम या मराठमोळ्या अभिनेत्याचे निधन, भावाने दिली दु:खद माहिती

'दृश्यम', 'सूर्यवंशी', 'मर्दानी' आणि 'एक व्हिलन रिटर्न्स' सारख्या बॉलिवूडमधील अनेक सर्वोत्कृष्ट चित्रपटांमध्ये काम करणारे आशिष वारंग यांचे आज निधन झाले आहे. ते ५५ वर्षाचे होते, त्यांच्या मृत्यूच्या बातमीने हिंदी आणि मराठी सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे. आशिष यांचे बंधू अभिजीत वारंग यांनी सोशल मीडियावर भावनिक पोस्टद्वारे आशिष यांच्या निधनाची माहिती दिली.

आशिष वारंग यांच्या मृत्यूचे खरे कारण अद्याप समोर आलेले नाही. ते बऱ्याच काळापासून आजारी होते. त्यांच्यावर मुंबईतील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांनी तिथेच अखेरचा श्वास घेतला. या गुणी अभिनेत्याने अनेक हिंदी आणि मराठी चित्रपटांमध्ये काम केले आहे.

'सूर्यवंशी' मधून ओळख


आशीष वारंग यांनी अनेक हिंदी चित्रपटांमध्ये महत्वपूर्ण पात्र साकारली आहेत. रोहित शेट्टीच्या 'सूर्यवंशी' चित्रपटातून त्यांना सर्वाधिक ओळख मिळाली होती. या चित्रपटात ते अक्षय कुमार आणि कतरिना कैफसोबत झळकले होते.

हिंदीच्या दिग्गज कलाकारांसोबत काम

आशिष वारंग यांनी त्यांच्या अभिनय कारकिर्दीत अजय देवगणसोबत 'दृश्यम' मध्ये काम केले आहे. त्यांनी राणी मुखर्जीसोबत 'मर्दानी' चित्रपटात देखील काम केले आहे. तसेच ते 'एक व्हिलन रिटर्न्स' चित्रपटाचाही भाग होते. तर त्यांचा संजय निरंजन दिग्दर्शित 'बॉम्बे' हा शेवटचा चित्रपट ठरला.

मराठी आणि साऊथ चित्रपटामध्येही केले काम

बॉलीवूड व्यतिरिक्त, आशिष वारंग यांनी 'धर्मवीर' या मराठी चित्रपटात काम केले आहे. याशिवाय त्यांनी दक्षिण चित्रपटांमध्येही काम केले आहे. त्यांनी मनोरंजन क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकारांसोबत काम केले आहे. आशीष



वारंग हे केवळ कलाकार म्हणून नव्हे तर चांगले माणूस म्हणून देखील सिने वर्तुळात प्रचलित होते. त्यांच्या चांगल्या वागणुकीमुळे त्यांनी आजवर केलेल्या प्रत्येक चित्रपटाच्या सेटवर लोकांची मने जिंकली आहेत. आणि याचमुळे त्यांच्या जाण्याने अनेकांना आपला शोक आवरता येत नाही आहे.

अमिताभ बच्चन आणि आमिर खानसोबत केले काम

आशिष वारंग यांनी त्यांच्या कारकिर्दीत काही मोठ्या कलाकारांसोबत काम केले होते. त्यांनी अमिताभ बच्चन, आमिर खान, रणवीर सिंग, कार्तिक आर्यन, आशुतोष राणा आणि जॉन अब्राहम यांच्यासोबत काम केले आहे. ते अनेकदा सोशल मीडियावर कलाकारांसोबतचे फोटो शेअर करायचे.

भाऊ अभिजीत वरंग यांनी पोस्टद्वारे दिली दुःखद बातमी

आशिष यांचे बंधू अभिजीत वारंग यांनी सोशल मीडियावर भावनिक पोस्टद्वारे आशिष यांच्या निधानाची माहिती दिली. वारंग आशिष दादा, तुम्हाला खूप मिस करू. प्रथम तुम्ही हवाई दल अधिकारी म्हणून देशाची सेवा केली आणि नंतर अभिनयातून प्रेक्षकांची मने जिंकली. आम्ही एक चांगला माणूस गमावला आहे., असे अभिजीत यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे. आशिष यांच्या निधनानंतर सिनेसृष्टीसह सोशल मीडियातून त्यांना श्रद्धांजली वाहिली जात आहे.

## जॉली एलएलबी ३ चित्रपट वादाच्या भोवऱ्यात



बॉलीवूड स्टार अक्षय कुमार आणि अर्शद वारसी यांच्या 'जॉली एलएलबी ३' या चित्रपटाचा वाद वाढतच चालला आहे. जॉली एलएलबी ३ या चित्रपटात अक्षय कुमार आणि अर्शद वारसी यांच्यासह सौरभ शुक्ला, अमृता राव, हुमा कुरेशी, नंदिनी कपूर आदि कलाकार महत्वपूर्ण भूमिका साकारणार आहेत. हा चित्रपट १९ सप्टेंबर रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असून हा चित्रपट न्यायालयीन कथेवर आधारित आहे. या चित्रपटाला काही वकिलांनी विरोध दर्शवला आहे. आता पाटणा उच्च न्यायालयात या चित्रपटाविरुद्ध जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेत असा दावा करण्यात आला आहे की 'जॉली एलएलबी ३' मध्ये न्यायव्यवस्था आणि कायदेशीर व्यवसायाचे अपमानजनक पद्धतीने चित्रण करण्यात आले आहे. यामुळे वकिलांची आणि संपूर्ण न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा दुखावली गेली आहे. 'जॉली एलएलबी ३' चित्रपटाविरुद्ध वकील नीरज कुमार यांनी पाटणा उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्याने न्यायालयाला या चित्रपटावर, त्यातील गाण्यांवर आणि प्रमोशनवर बंदी घालण्याची मागणी केली आहे. नुकतेच प्रदर्शित झालेले 'मेरा भाई वकील' हे गाणे आणि या चित्रपटाच्या ट्रेलरचा या प्रकरणात उल्लेख करण्यात आला आहे.

याचिकेत म्हटले आहे की, चित्रपटाच्या गाण्यावर आणि प्रमोशनल मटेरियलमध्ये कायदेशीर व्यवसाय हास्यास्पदरीत्या दाखवण्यात आले आहे. यामुळे केवळ वकिलांची प्रतिष्ठाच खराब होत नाही तर जनतेमध्ये न्यायव्यवस्थेची प्रतिमाही डागाळली जात आहे.

याचिकेत, हायकोर्टाला जॉली एलएलबी ३ चे वादग्रस्त गाणे आणि ट्रेलरवर तात्काळ बंदी घालण्याची विनंती करण्यात आली आहे. तसेच, चित्रपट निर्मात्यांनी बार कौन्सिल ऑफ इंडिया आणि बिहार स्टेट बार कौन्सिलची परवानगी घेऊन चित्रपटात आवश्यक बदल

## प्रणित मोरेवर सलमानचा घणाघाती प्रहार! प्रणित मोरेला सलमान खानने दाखवला आरसा, म्हणाला... मर्यादा ओलांडलीस

मुंबई : 'बिग बॉस १९'चा पहिला आठवडा प्रेक्षकांसाठी जबरदस्त मसालेदार ठरला आहे. घरात रोज कुठेतरी वाद, भांडणं आणि गोंधळ होत असून प्रेक्षकांना हाय व्होल्टेज ड्रामा पाहायला मिळत आहे. यामध्ये सर्वाधिक चर्चेत असलेलं नाव म्हणजे फरहाना भट. फरहाना काही दिवस 'सिक्रेट रूम'मध्ये होती. पण आता ती पुन्हा घरात परतली असून तिच्या पुनरागमनाने बिग बॉसचं घर अक्षरशः हललं आहे. घरात पाऊल टाकताच फरहानाने सदस्यांचे अनेक गुपित उघड केले आहेत. यामुळे काही सदस्य धास्तावले तर काहींमध्ये नवी चर्चा रंगली आहे. फरहानाने केवळ गुपितांचं बॉम्बस्फोटच केला नाही तर घरातील दोन महत्त्वाच्या स्पर्धकांना गौरव खन्ना आणि झीशान कादरी यांना भिडवून झालेला वाद मिटवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तिच्या समेटामुळे घरातील वातावरण थोडं शांत झालं असलं तरी फरहानाच्या परतण्याने पुढील दिवसांत घरात नवा तुफान डोकेदुखी होणार, हे नक्की दिसून येत आहे. सोशल मीडियावरदेखील फरहाना भट प्रचंड चर्चेत असून ट्विटर आणि इन्स्टाग्रामवर ती सतत ट्रेंड होत आहे. तिच्या परतीनंतर बिग बॉस १९ मध्ये अजून रंगत वाढणार यात शंका नाही.

'बिग बॉस १९'च्या घरात स्पर्धक प्रणित मोरे सध्या चर्चेत आला आहे. प्रणित हा व्यावसायिक कॉमेडीयन असून त्याने बिग बॉस मध्ये येण्याआधी अनेक लोकप्रिय कॉमेडी शोजमध्ये काम केले आहे. या शोजमध्ये त्याने अनेकदा बॉलीवूडचा दबंग स्टार सलमान खान यांच्यावर विनोदी पद्धतीने टीका केली होती. त्यांच्या करिअरवरून तेव्हा चिमटे काढले गेले, अगदी त्यांच्यावर झालेल्या वादग्रस्त प्रकरणांचीही खिल्ली





उडवली गेली होती. आता त्याच पार्श्वभूमीवर एक नवा प्रोमो कलर्स टीव्हीने सोशल मीडियावर शेअर केला असून तो क्षणात व्हायरल झाला आहे. या प्रोमोमध्ये सलमान खान बिग बॉसच्या घरातील स्पर्धक प्रणित मोर याच्यावर थेट संताप व्यक्त करताना दिसत आहेत. प्रणितच्या पूर्वीच्या विनोदांनी आणि टोमण्यांनी दबंग खान नाराज असल्याचं या प्रोमोमधून स्पष्ट होतं. या व्हिडिओमुळे सोशल मीडियावर चाहत्यांमध्ये जोरदार चर्चा सुरू झाली आहे. काहींनी प्रणितच्या धाडसाचं कौतुक केलं, तर काहींनी सलमानच्या संतापाचं समर्थन व्यक्त केलं. आगामी भागात या वादाची पुढील कहाणी कशी उलगडते, याकडे प्रेक्षकांचं लक्ष लागलं आहे.

रूपयाची पातळी ८८.१५ प्रति डॉलर पोहोचली रूपया नव्या निचांकी पातळीवर!

मोहित सोमण:आजही डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण झाल्याने रूपया नव्या निचांकी पातळीवर घसरला आहे. आज सकाळी प्रति डॉलर किंमत पातळी ८८.१५ रूपयांवर गेली. ...

सलमान खानचा प्रणित मोरला सवाल - मर्यादा ओलांडलीस का?

शोच्या ताज्या प्रोमोमध्ये होस्ट सलमान खानने कॉमेडीयन प्रणित मोरेला थेट स्टेजवरून सवाल करताना पाहायला मिळालं. प्रणित मोरे हा स्टँड-अप कॉमेडीयन असून त्याने अनेकदा आपल्या शोमध्ये सलमान खानवर विनोद केले होते. सलमानने प्रणितकडे पाहून स्पष्ट शब्दांत सांगितलं, तू स्टँड-अप कॉमेडीयन आहेस, मला माहित आहे की तू माझ्याबद्दल बाहेर काय काय बोललास. पण ते योग्य नाही. माझ्यावर केलेले जोक्स जर मी तुझ्या जागी असतो आणि तू माझ्या जागी असतास, तर तुझी प्रतिक्रिया काय असती? लोकांना हसवायचं होतं म्हणून माझं नाव वापरलं, पण मला वाटतं की तू एक मर्यादा ओलांडलीस. सलमानचा हा सवाल ऐकून घरातील इतर सदस्यांसह प्रेक्षकांचीही उत्सुकता वाढली आहे. प्रणित यावर काय उत्तर देतो आणि या वादाचा पुढे शोच्या वातावरणावर काय परिणाम होतो, याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे.

फरहाना भट पुन्हा घरात

प्रणित मोरला फटकारल्यानंतर आता सलमान काय निर्णय घेणार, याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. दरम्यान, स्पर्धक फरहाना भटही पुन्हा चर्चेत आली आहे. शोच्या पहिल्याच दिवशी घरातील सदस्यांनी तिला घराबाहेर काढलं होतं. मात्र, बिग बॉसने तिला थेट बाहेर न काढता गुप्त खोलीत ठेवले होते. तिथून फरहानाने घरातील सदस्यांचे संवाद ऐकले आणि बिग बॉससमोर स्वतःची मतं मांडली. आता, ताज्या भागात फरहाना पुन्हा एकदा घरात प्रवेश करत आहे. तिच्या पुनरागमनामुळे घरातील नाती, गटबाजी आणि वाद अधिक रंगतदार होण्याची शक्यता आहे. बसीर-प्रणितवर रोष, कुनिकेचं गुपित उघड 'बिग बॉस १९'च्या घरात परतताना फरहाना भटने सुरुवातीपासूनच धडाकेबाज एंट्री केली आहे. गुप्त खोलीतून बाहेर पडून घरात येताच तिने घरातील सदस्यांची गुपितं उघड करत वादाला सुरुवात केली. फरहानाने सर्वात आधी बसीर अलीवर निशाणा साधला. त्याच्यावर रोष व्यक्त करत तिने घरात वातावरण चांगलंच तापवलं. यानंतर तिने प्रणित मोरेच्या कॉमेडीवर टिप्पणी करत त्याचे विनोद खूपच वाईट असल्याचं स्पष्टपणे सांगितलं. फरहाना इथेच थांबली नाही. तिने गौरव खन्नाला कुनिका सदानंदबद्दल धक्कादायक माहिती दिली. कुनिका

## गणपती विसर्जनात सलमान खान आणि सोनाक्षी सिन्हाने ढोल ताशांच्या तालावर केला डान्स...



मुंबई-बॉलिवूड स्टार सलमान खाननं अलीकडेच त्याच्या घरी गणपती बाप्पाची स्थापना केली, यामध्ये त्याचे कुटुंबीय आणि नातेवाईक सहभागी झाले होते. आता बाप्पाच्या निरोपाचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये सलमान खान जोरदार नाचताना दिसत आहे. या व्हिडिओमध्ये सलमान खानचे संपूर्ण कुटुंब आहे. 'भाईजान'सह, त्याची बहीण अर्पिता खान शर्मा देखील ढोलाच्या तालावर डान्स करत आहे. अरबाज खानचा मुलगा देखील यावेळी उपस्थित असल्याचा दिसत आहे. इतकेच नाही तर 'लेडी दबंग' सोनाक्षी सिन्हा पती झहीर इक्बालबरोबर या सेलिब्रेशनमध्ये सहभागी झाली आहे.

सलमान खानचा व्हिडिओ व्हायरल : व्हिडिओमध्ये सलमान खान निळ्या रंगाचा टी-शर्ट आणि जीन्समध्ये आहे आणि अर्पिता देखील त्याच्या शेजारी लाल सूटमध्ये डान्स करत आहे. अर्पिताच्या समोर आयुष शर्मा त्याच्या मुलीला कडेवर घेऊन डान्स करत आहे अर्पिताच्या शेजारी अरबाज खानचा मुलगा आणि आयुषच्या शेजारी सोहेल खानचा मुलगा असे कुटुंबातील सदस्य आहे. व्हिडिओमध्ये, झहीर इक्बाल सोनाक्षी सिन्हा दोघेही डान्स करत आहेत. यावेळी सलमान खानला त्याच्या चाहत्यांनी आणि नातेवाईकांनी वेढलेला आहे. आता सलमनाचा हा व्हिडिओ अनेकांना आवडत आहे.

सलमान खानचा आगामी चित्रपट : सलमान खानने त्याच्या घरातील गॅलेक्सीमधील बाप्पाच्या विराजमानचा व्हिडिओ शेअर केला होता, ज्यामध्ये तो त्याच्या कुटुंबासह गणेश आरतीत सहभागी झाला होता. सलमानच्या चाहत्यांनाही हा व्हिडिओ खूप आवडला होता. सलमानच्या घरी दरवर्षी गणेश चतुर्थी सण साजरा केला जातो. सलमानच्या कामाच्या बाबतीत बोलायचे झाले तर, तो सध्या त्याच्या आगामी युद्धावर आधारित चित्रपट 'बॅटल ऑफ गलवान'चे शूटिंग करत आहे. या चित्रपटाच्या सेटवरून सलमानचे फोटोही समोर आले होते. या चित्रपटाचे दिग्दर्शन अपूर्व लाखिया हे करत आहे. याशिवाय, सलमान खान त्याच्या सर्वात लोकप्रिय टीव्ही रिॲलिटी शो 'बिग बॉस'च्या १९व्या सीझनचे सूत्रसंचालन देखील करत आहे. या शोच्या माध्यामातून सलमान खान पुन्हा एकदा आपल्या चाहत्याचे मनोरंजन करत आहे. हा शो अनेकांना आवडत आहे.

## घटस्फोटाच्या अफवांमध्ये गणेश विसर्जनात गोविंदाने पत्नीबरोबर केला डान्स

मुंबई -बॉलिवूड स्टार्स यावेळी गणेश चतुर्थी साजरी करत आहेत. यापूर्वी स्टार्सनी गणपती विराजमान साजरा केला आणि आता बाप्पाच्या निरोपावर स्टार्समध्ये उत्सव पाहायला मिळत आहेत. दरम्यान, 'हिरो नंबर १' स्टार गोविंदानं त्याची पत्नी सुनीता आहुजा आणि त्याच्या कुटुंबासह बाप्पाला निरोप दिला आहे.

घटस्फोटाच्या अफवांमध्ये, गोविंदा आणि सुनीता हे पुन्हा एकदा एकत्र दिसले. आता या जोडप्यांनी घटस्फोटाच्या अफवांना पूर्णविराम दिला आहे. यापूर्वी, सुनीता म्हणाली होती की, देवही गोविंदाला तिच्यापासून वेगळे करू शकत नाही.

गोविंदा-सुनीता यांनी बाप्पाच्या निरोपावर केले नृत्य : व्हायरल व्हिडिओमध्ये, दिसते की, गोविंदानं क्रीम रंगाचा कुर्ता पायजमा घातला आहे आणि सुनीताने लाल आणि क्रीम रंगाचा ड्रेस परिधान केला आहे. तसेच गोविंदा आणि सुनीता यांची मुलेही येथे आहेत. गोविंदाचा मुलगा हर्षवर्धन बाप्पाला आपल्या मांडीवर घेऊन गाडीत विसर्जनासाठी घेऊन जात आहे. याशिवाय गोविंदा आणि सुनीता बाप्पाच्या निरोपावर डान्स करत आहेत. गोविंदा आणि सुनीता यांचा हा



व्हिडिओ स्पष्टपणे दर्शवितो की या जोडप्यात सर्व काही ठीक आहे. या जोडप्याचे चाहते देखील या व्हिडिओवर कमेंट करत आहेत.

लोकांनी या जोडप्यावर केला प्रेमाचा वर्षाव : गोविंदा आणि सुनीताच्या डान्स व्हिडिओबाबत एका चाहत्यांने म्हटले, 'लोक अनावश्यकपणे त्यांच्या घटस्फोटाच्या खोट्या बातम्या पसरवत आहेत.' दुसऱ्या एकानं लिहिलं आहे की, 'किती सुंदर जोडपे आहे.' आणखी एकाने लिहिले की, 'मला माहित नाही की, लोकांना एखाद्याबद्दल खोट्या बातम्या पसरवण्यात काय मिळते.' याशिवाय काहीजण या व्हिडिओच्या पोस्टमध्ये हार्ट इमोजी शेअर करत आहेत.


# माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी निवेदने स्वीकारत साधला नागरिकांशी संवाद

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था, संघटना सदस्य, काँग्रेस महाविकास आघाडी, मित्र पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यासोबतच लातुर शहर व परिसरातील नागरिकांची भेट घेत त्यांच्या अडीअडचणी, समस्या समजून जाणून घेतल्या, त्यांची निवेदने, तसेच निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना तात्काळ पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.



यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव समद पटेल, माजी महापौर दीपक सुळ, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हा. चेअरमन प्रमोद जाधव, उपसभापती सुनील पडीले, संचालक अनुप शेळके, लातूर तालुका काँग्रेसचे सुभाष घोडके, माजी नगरसेवक पप्पू देशमुख, प्रभाग १५ चे काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष राजकुमार कत्ते, लातूर जिल्हा शिक्षक काँग्रेसचे अध्यक्ष बाळासाहेब चव्हाण, राम देशमुख, व्यंकटेश पुरी, प्रा.सुधीर अनवले, प्रभाग १३ काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष विजय गायकवाड, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, विष्णुदास धायगुडे, दिनेश गोजमगुंडे, अवीरराजे निबाळकर, सचिन मस्के, दिलीप मोरे आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध सेलचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## रेल्वेकडून मुंबई – रीवा विशेष गाड्यांच्या सेवांमध्ये वाढ



**मुंबई/प्रतिनिधी :** प्रवाशांच्या अतिरिक्त गर्दीचा ताण कमी करण्यासाठी मुंबई आणि रीवा दरम्यान धावणाऱ्या विशेष गाड्यांच्या सेवा रेल्वेकडून खालीलप्रमाणे वाढविण्यात येणार आहेत:

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई रीवा विशेष सेवा

०२१८८ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई रीवा विशेष गाडी प्रत्येक शुक्रवार धावते; तिचा कालावधी वाढवून ती आता ०३.१०.२०२५ ते २६.१२.२०२५ या दरम्यान (१३ वाढलेल्या सेवा) चालविण्यात येणार आहे.

०२१८७ रीवा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई विशेष गाडी प्रत्येक गुरुवारी धावते; तिचा कालावधी वाढवून ती आता ०२.१०.२०२५ ते २५.१२.२०२५ या दरम्यान (१३ वाढलेल्या सेवा) चालविण्यात येणार आहे.


गाडीच्या चालण्याच्या वारांमध्ये, वेळापत्रकात, संरचनेत व थांब्यांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

आरक्षण : विशेष गाडी क्रमांक ०२१८८ च्या वाढीव फ ेऱ्यांचे आरक्षण विशेष शुल्कासह दि. ०७.०९.२०२५ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच http://www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू होईल.

या विशेष गाडीच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रक जाणून घेण्यासाठी कृपया http://www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES App डाउनलोड करा. प्रवाशांनी विशेष गाड्यांच्या सेवांचा लाभ घ्यावा.

## आकाश सिंगारे यांचे सेट-नेट मध्ये घवघवीत यश

**लातूर/प्रतिनिधी :** येथील लातूर रहिवाशी असलेल्या आकाश संजीव सिंगारे याने एम एच सीईटी आणि एनटीएच्या वतीने घेण्यात आलेल्या सीएसआयआर नेट परीक्षेत घवघवीत यश मिळविले असून त्याचा जीआरएफ रँक १०७ असा आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक केले जात आहे.



आकाश यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील भौतिक आणि रसायनशास्त्र (फिजीकल केमिस्ट्री) या शाखेतून पदव्यूत्तर शिक्षण घेतले असून हे यश त्याच्या कठोर परिश्रम, प्रखर बुद्धिमत्ता आणि शैक्षणिक निष्ठेचे द्योतक असून विद्यापीठ नादेड येथील रसायनशास्त्र संकुलासाठी ही बाब अभिमानाची ठरली आहे. एमएचटी सेट परीक्षेत आकाशने यश संपादन केले आहे. या यशामुळे आकाश संजीव सिंगारे यांना पीएच. डी. संशोधनासाठी संशोधन फेलोशिपची संधी उपलब्ध होणार आहे.

## मनकर्णाबाई प्रभू खटाळ यांचे निधन

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यातील सेलू जवळगा येथील मनकर्णाबाई प्रभू खटाळ यांचे अल्पश: आजाराने आज शुक्रवार दि. ५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८:३० च्या सुमारास निधन झाले आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ७८ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पती प्रभू किसन खटाळ यांच्यासह दोन मुलं, दोन मुली नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सेलू जवळगा परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्यावर शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता येथील स्मशानभूमीत परिसरातील नागरिक व नातेवाईकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



## गणेश मंडपात खेळताना अस्वस्थ वाटलं, घरी येऊन आईच्या कुशीत विसावला, १० वर्षाच्या मुलाचा हार्टअटॅकने मृत्यू!

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापूर जिल्ह्यातील कोडोली गावात बुधवारी रात्री घडलेली एक हृदयद्रावक घटना संपूर्ण गावाला सुन्न करून गेली. अवघ्या दहा वर्षांच्या श्रावण अजित गावडे या चिमुकल्याचा हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने मृत्यू झाला. अधिक वेदनादायक बाब म्हणजे, श्रावणने आपला अखेरचा श्वास आपल्या आईच्या मांडीवर घेतला.

याबाबत अधिक माहिती अशी की, आनंदनगर वसाहतीतील शिवनेरी गल्लीमध्ये राहणाऱ्या गावडे कुटुंबातील श्रावण बुधवारी संध्याकाळी गणेश मंडळाच्या शेडमध्ये मित्रांसोबत खेळत होता. तो नेहमीप्रमाणेच हसत-खेळत होता. मात्र, काही क्षणांतच त्याला अचानक अस्वस्थ वाटू लागले. खेळ सोडून तो धावत घराकडे गेला आणि थेट आईच्या मांडीवर जाऊन विसावला. आईच्या कुशीत डोके ठेवून तो काहीतरी सांगू पाहत होता, पण क्षणार्धात त्याला तीव्र स्वरूपाचा हृदयविकाराचा झटका आला आणि आईच्या मांडीवरच त्याने डोळे मिटले. श्रावणच्या आईने टाकलेला आर्त हंबरडा आणि मदतीसाठीची धडपड पाहून शेजारी धावून आले. त्याला तात्काळ नजीकच्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्याचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, हा मृत्यू अचानक आलेल्या हृदयविकारामुळे झाला. ही घटना संपूर्ण परिसरासाठी धक्कादायक ठरली आहे.

श्रावण हा इयत्ता चौथीत शिकत होता आणि आपल्या आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. या कुटुंबाने चार वर्षांपूर्वीच आपल्या लहान मुलीला गमावले होते, आणि आता श्रावणही अचानक काळाच्या पडद्याआड गेला. एकामागून एक अपघातांमुळे गावडे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेने संपूर्ण कोडोली गाव हळहळून गेला असून, गावात शोककळा पसरली आहे.याबाबत हृदयरोग तज्ञ डॉक्टर अक्षय बाफना म्हणाले की, या वयाचे जे पेशंट असतात, त्यांच्यामध्ये काहीतरी जेनेटिक आरोग्य समस्या असतात. किंवा हृदयाला रक्त पुरवठा करणाऱ्या रक्तवाहिनीमध्ये प्रॉब्लेम होऊन अशा समस्या होतात. एकाएकी काही त्रास झाल्यास, ताणतणाव असेल किंवा एकाएकी धावपळ केल्यानंतर हृदयाला होणारा रक्तपुरवठा कमी होऊन असे अटॅक येऊ शकतात.

## गुंठेवारीवरील बंदी कायमस्वरूपी उठवून प्रकरणे तात्काळ निकाली काढा; इंजिनिअर्स असो. पालिका आयुक्तांना निवेदन



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर हद्दीतील प्लॉटच्या गुंठेवारी करणे बंद असल्याचे महानगरपालिका नगररचना विभागाकडून कळविण्यात आले आहे. यामुळे सद्या प्लॉट खरेदी, विक्री, बांधकाम परवाने बंद आहेत यामुळे गुंठेवारीस मुदतवाढ देण्यात यावी, दीडशे ते तीनशे चौरस मीटरपर्यंतच्या घर बांधकामांना खाजगी अभियंत्यांच्या मंजुरीवर परवानगी देण्यात यावी अशी मागणी इंजिनिअर्स असोसिएशन लातूरच्या वतीने महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे.

याबाबत लातूर जिल्हा इंजिनिअर्स असोसिएशनच्या वतीने निवेदनात नमूद करण्यात आले आहे की लातूरचे जिल्हाधिकारी कार्यालय जा.क्र.२०२४/महसुल / गुंठेवारी/ जमा-१/डेस्क-५/कावी-३४४ दिनांक १४/०२/२०२४ रोजीच्या आदेशानुसार आपल्या कार्यालयाकडून यावर अंमलबजावणी होणे आवश्यक होते, याबाबत असोसिएशनच्या वतीने आपल्या कार्यालयास दि. १४/ मार्च २०२४ रोजी निवेदन देऊन गुंठेवारी सुरू करण्यासाठी विनंती करण्यात आली होती मात्र अद्यापपर्यंत गुंठेवारीचे काम सुरू नाही. नगर रचनाकार यांच्या हलगर्जीपणामुळे शहरामधील प्लॉटची खरेदी, विक्री करणे व बांधकाम परवानगी यास खिळ बसली आहे. यामुळे सर्वसामान्य लातूरकरांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महानगरपालिका आयुक्त यांनी गुंठवारीवरील बंदी उठवावी दीडशे ते तीनशे चौरस मीटरपर्यंतच्या घर बांधकामांना खाजगी अभियंत्यांच्या मंजुरीवर परवानगी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असून याला जिल्ह्यातील सर्व इंजिनिअर्सनी पाठिंबा दर्शविला आहे. यावेळी लातूर जिल्हा इंजिनिअर्स असो. चे अध्यक्ष अभिजीत देशपांडे सरसंबेकर,तय्यब सय्यद, वसीम शेख मनोज देशमुख,अहमद मुल्ला,ऋषिकेश निगडीकर,रिजवान गडीवाले उपस्थित होते.

## सोयाबीनवर येलो मोझॅक रोगाचा वाढता प्रादुर्भाव: यंदा उत्पादन घटण्याची भीती

**औसा/प्रतिनिधी :** औसा तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात हेक्टरवर सोयाबीन पीक घेण्यात आले आहे. मात्र या हंगामात सततचा पाऊस व वातावरणात सातत्यानं बदल होत असल्याने सोयाबीन पिकावर विषाणूजन्य येलो मोझँक रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळं उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे.

गतवर्षी अत्यल्प पावसामुळे खरीप हंगामात शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न हातात पडले नाही.जून महिना पुर्णपणे कोरडा गेल्याने शेतकऱ्यांना पेरणीसाठी जुलै महिना उजाडला यानंतर ऑग महिन्यात पावसाने दडी मारल्याने फुलात आलेले सोयाबीन कोमेजून गेले परिणामी सोयाबीन शेंगा चे प्रमाण कमी राहिले त्यानंतर परतीच्या पावसामुळे बहुतांश भागातील काढणीला आलेले सोयाबीन पाण्यात राहिले एकंदरीत या सर्व बाबींमुळे सोयाबीन उत्पादनात मोठी घट झाली. यावर्षी मात्र पावसाने मे महिन्यात हजेरी लावली त्यामुळे जवळपास सर्वच खरिप हंगामातील क्षेत्रात जून व जुलै महिन्यात पेरणी झाली यानंतरही जुलै महिन्यात पावसाचा खंड पडला तर ऑगस्ट महिन्यात पुन्हा पावसाने जोर धरला त्यामुळे पिकेही जोमात असताना आता पिकावर विषाणूजन्य येलो मोझँक रोगाचा प्रादुर्भाव होत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.

औसा तालुक्यात यावर्षी खरीप हंगामात सोयाबीन ९१०६६ हेक्टर, तूर७९६५ हेक्टर, मुग १२७५ हेक्टर तर १९२९ हेक्टरवर पेरणी झाली आहे. मागील अनेक महिन्यांपासून हवामानात वारंवार होत असलेल्या बदलाचा फटका पिकांना बसत असल्याने शेतकरी आर्थिक संकटाच्या लोटला जात आहे.मुगावरही पिकांवर करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळं हाताशी आलेली पिके आपोआप करपून जात आहेत. सध्या तेलाचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे भुईमूग, सोयाबीन, तीळ या पिकांचे उत्पादन समाधानकारक झाले तर चांगला भाव मिळाला असता. परंतू हातातोंडाशी आलेल्या पिकांवर दरवेळी रोगांचे आक्रमण होत आहे. यावर्षी काही ठिकाणी समाधानकारक पाऊस झाल्यामुळे विहिरीत पुरेसं पाणी आहे. तसेच जिल्ह्यात काही ठिकाणी धरण भरल्यामुळे कालव्यालादेखील नियमित पाणी येत आहे. त्यामुळे बळीराजाने यावर्षी मोठ्या प्रमाणावर उन्हाळी पिकाची लागवड केली. मात्र हे पीक येलो मोझँक रोगाच्या प्रादुर्भावामुळे डोळ्यांदेखत करपून जात आहे.त्यामुळे मूग पिकात मोठी घट होण्याची शक्यता आहे.पिकांमध्ये कसर भरून काढण्यासाठी बळीराजाने परिश्रम घेतले, मात्र आता बळीराजाच्या अपेक्षेवर रोगाने पाणी फिरविले असल्याचे दिसून येत आहे.

## माय.. बाप... सरकारने, आम्हालाही हैद्राबाद गॅझेट लागू करावे

### मराठवाड्यातील आदिवासी कोळी महादेव समाज करणार १७ सप्टेंबरला तिव्र निषेध आंदोलन

**निलंगा/आयुब बागवान:** १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु १७ सप्टेंबर १९४८ ला मराठवाडा (निजाम राज्य ) भारतामध्ये समाविष्ट झाला. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात महादेव कोळी व मल्हार कोळी ह्या दोन जमाती प्रामुख्याने राहतात त्यांचे वास्तव्य बालाघाट पर्वतरांगा, नळदुर्गचा भाग, गोदावरी नदीचा दक्षिण भाग असा स्पष्ट समावेश निजाम गॅजेटमध्ये आहे. परंतु स्वातंत्र्याच्या ७८ वर्षातही या जमातीला अद्याप पर्यंत न्याय मिळालेला नाही. मराठवाडा सकल आदिवासी कोळी महादेव जमातीचे वतीने मागणी करण्यात येते की, मराठा समाजा प्रमाणे कोळी महादेव, कोळी मल्हार जमातीला हैदराबाद गॅझेट लागू करावे अशी मागणी आंदोलनकर्ते चंद्रहास नलमले यांनी केली आहे.



राज्य शासनाने मराठा समाजाला नुकतेच हैदराबादचे गॅजेट लागू केले आहे. कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र मिळून शैक्षणिक व नोकरीसाठी आरक्षण मिळणार आहे. परंतु गेल्या ३० ते ३५ वर्षापासून मराठवाड्यातील कोळी महादेव व मल्हार कोळी या समाजाकडून हैदराबाद गॅझेट, हैद्राबादचे लोक लेखक र.मू. जोशी. (१९५४) सर्व शासकीय दस्तऐवजांचे अवलोकन केले असता 'कोळी महादेव व कोळी मल्हार' या जमातीचे मूळ वस्तीस्थान हे तत्कालीन हैदराबाद (निजाम) राज्यातील म्हणजेच आताच्या मराठवाड्यातील बालाघाट- महादेव व अजिंठा डोंगर रांगा असल्याचे सिद्ध होते. तसेच हैदराबाद राज्यात म्हणजेच आताच्या मराठवाड्यात कोळी ही मुख्य जमात अंतर्गत कोळी महादेव व कोळी मल्हार या दोनच जमाती आढळतात असा स्पष्ट उल्लेख आहे मराठवाड्यातील या दोन्ही जमातीच्या बांधवांना मा. उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर, मा. उच्च न्यायालय मुंबई व सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणात पडताळणी समितींना वैधता देण्याचे आदेश अनेक प्रकरणात दिले आहे.

महाराष्ट्रात अनुसूचित जमातीमध्ये एकुण ४७ जमाती येतात परंतु ३३ जमातीला त्या प्रवर्गात राहून आजही न्याय मिळत नाही. हा लाभ केवळ आदिवासी क्षेत्रातील २४ आमदारांना मिळतो आहे. त्यामध्ये पालघर, नंदूरबार, शहादा, अक्कलकुवा, साक्री, शिरपूर, मधुकर पिचड यांचा अकोले मतदार संघ असे ठराविक आमदार घेतात. त्याच्या नोंदी कोळी असूनही महादेव कोळी प्रमाणपत्र व वैधता सहज मिळवतात.

परंतु उर्वरित वंचित जमातीला सुलभतेने जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीकडून वैधता मिळत नाही त्यामध्ये विशेषत: कोळी महादेव, कोळी मल्हार, टोकरे कोळी, डोंगरे कोळी यासह आदी जमातीचा समावेश आहे. मुंबई येथे नुकत्याच झालेल्या मराठा आंदोलनाची दखल घेऊन स्वतंत्र मराठवाड्यासाठी महाराष्ट्र सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करून कुणबी, मराठा-कणबी प्रमाणपत्र देण्याचा शासन निर्णय काढला आहे. तसाच निर्णय राज्य सरकारने कोळी महादेव व कोळी मल्हार जमातीसाठी लागू करावा अशी मागणी आम्ही करत आहोत जर ही मागणी मान्य नाही झाल्यास १७ सप्टेंबर २०२५ मराठवाडा मुक्ती संग्राम दिन या दिवशी आठही जिल्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेध आंदोलन करणार आहोत याची शासनाने दखल घ्यावी असे आवाहन त्यांनी केले आहे.

सकल आदिवासी कोळी महादेव जमातीचे वतीने वर्षभरात आजपर्यंत जलसमाधी आंदोलन, श्रावण महिन्यात मुंडन आंदोलन, दंडवत आंदोलन, नऊ दिवस अन्नत्याग उपोषण असे आंदोलन केले होते.

## पृथ्वीवरील सर्वात मोठा हिमनग चक्काचूर; संशोधकांकडूनही चिंता व्यक्त

नवी दिल्ली : पृथ्वीवर वर्षानुवर्षांवर्षांपासून होणाऱ्या भौगोलिक बदलांमध्ये आता आणखी एका मोठ्या आणि काहीशा चिंता वाढवणाऱ्या बदलाची भर पडली आहे. हे संकट प्रत्यक्षात आपल्यापासून बरंच दूर असलं तरीही त्याची व्याप्ती पाहता येत्या काळात हवामानविषयक बदल चिंता वाढवू शकतात असा इशारा संशोधकांनी दिला आहे. जागतिक स्तरावरील हवामान अभ्यासकांच्या माहितीनुसार जगातील, पृथ्वीवरील सर्वात मोठा हिमनग अ२३अ चक्काचूर होण्यास सुरुवात झाली असून, सर्वात मोठा तरंगता हिमनग आता नष्ट होत आहे हे दाहक वास्तव. या बदलामुळं हवामान चक्राचाही नाश होण्याची भीती असून, त्यामुळं समुद्रातील पाण्याच्या पातळीतही झपाट्यानं वाढ होण्याची चिंता संशोधकांनी व्यक्त केली आहे. हा हिमनग अर्थात घ्मीु १९८६ मध्ये अंटार्क्टिकाच्या फिल्नचर रोने हिमखंडापासून वेगळा झाला होता. दशकानुदशकं अंटार्क्टिकापाशीच राहीला मात्र सागरी लाटांनी त्याला उत्तरेकडे ढकललं जिथं सहसा हे हिमनग वितळण्यास सुरुवात होते. २०२५ च्या सुरुवातीला या हिम नगाचा आकार रोड बेटाइतका असून त्याचं वजन १ ट्रिलियन इतका होता. आता मात्र त्याचा आकार ह्यूस्टन शहराइतका लहान झाला असून, काही काळातच या हिमनगाचं अस्तित्वं नाहीसं होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के

कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.




शाखा १. जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर

शाखा २. जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर

संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# माधवराव पाटील महाविद्यालयात शिक्षक दिन व्याख्यानाने साजरा




मुरूम (सुधीर पंचगल्ले) - येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या जन्म दिवस हा शिक्षक दिन शुक्रवारी (ता.५) रोजी व्याख्यानाने साजरा करण्यात आला. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. नरसिंग कदम यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् : व्यक्ति आणि विचार या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. अरुण बावा, प्रा. गोपाळ कुलकर्णी, डॉ. सुजित मटकरी, डॉ. नागोराव बोईनवाड, डॉ. नागनाथ बनसोडे, डॉ. विलास खडके, डॉ. दिनकर बिराजदार, डॉ. संध्या डांगे, डॉ. जयश्री सोमवंशी, डॉ. सुभाष हुलपल्ले, लालाअहमद जेवळे, इसाली चाऊस, चंद्रकांत पुजारी, व्यंकट मंडले आदिंसह विद्यार्थी-विद्यार्थींनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आप्पासाहेब सुर्यवंशी यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. महेश मोटे तर आभार डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी मानले.

# अनंतराव घोगरे यांची राष्ट्रीय प्रधान मुखिया सरपंच संघ, महाराष्ट्र राज्य धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख पदी नियुक्ती



कळंब (प्रतिनिधी)- तालुक्यातील गोविंदपूर (जि. धाराशिव) या गावाचा अभिमान आणि ग्रामीण भागातील लोकनेते म्हणून ओळखले जाणारे श्री. अनंतराव घोगरे यांची राष्ट्रीय प्रधान मुखिया सरपंच संघ, महाराष्ट्र राज्य या प्रतिष्ठित संघटनेच्या धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुखपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती त्यांच्या ग्रामविकासासाठी केलेल्या कार्यक्षमता, जनसंपर्क, नेतृत्वगुण आणि दूरदृष्टी यांचा गौरव म्हणून करण्यात आली आहे. गावोगावच्या समस्या समजून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील राहिले आहेत. ग्रामीण भागातील तरुणांना प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व म्हणूनही त्यांची ओळख आहे.

कोअर कमिटी व इतर पदाधिकाऱ्यांचे सहकार्य संघटनेच्या कोअर कमिटीतील सदस्य व राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांनीही घोगरे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यात प्रेम साहू, महेंद्र यादव (झारखंड), अर्पिता पांडा (ओडिशा), ईश्वर साहू (छत्तीसगड), पद्माकर मलीक (गोवा प्रभारी), सुबत्ता सामंत, सुनिल पाटील (महाराष्ट्र प्रभारी), ज्ञानेश्वर जाधव (राज्य उपाध्यक्ष), मंगेश तायडे, राजकुमार मेश्राम, जितेंद्र गोडांणे, परभणी जिल्हाध्यक्ष शिवाजी पवार, भारत आव्हाड, सुनिता सुतार (महिला प्रदेशाध्यक्षा), अरुणा वेणुगोपाल (उपाध्यक्ष), जयश्री वंजारी (महिला कार्याध्यक्षा) आदी मान्यवरांचा समावेश होता.

गावाचा गौरव अनंतराव घोगरे यांच्या नियुक्तीमुळे धाराशिव जिल्ह्यासह गोविंदपूर गावाचे नाव राज्य व राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल झाले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण विकास क्षेत्रात नवे उपक्रम राबवले जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**जबाबदारी व अपेक्षा**

धाराशिवसह संपूर्ण मराठवाडा प्रदेशातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक प्रशासकीय यंत्रणांमध्ये समन्वय साधून विकासकामांना गती देण्याची महत्त्वाची जबाबदारी आता घोगरे यांच्यावर सोपवण्यात आली आहे. विविध शासकीय योजना प्रभावीपणे राबवणे, लोकशाही पद्धतीने गावागावांतील जनतेचा आवाज राज्य व राष्ट्रीय स्तरावर पोहोचवणे हे त्यांच्या कामकाजाचे केंद्रबिंदू राहणार आहेत. राष्ट्रीय स्तरावरून अभिनंद अनंतराव घोगरे यांच्या नियुक्तीबद्दल संघटनेच्या राष्ट्रीय नेतृत्वाकडून हार्दिक शुभेच्छांचा वर्षाव झाला आहे. या प्रसंगी प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली.

ठाकुर चंदन सिंग (बिहार) - राष्ट्रीय अध्यक्ष,आदित्य उपाध्याय (छत्तीसगड) - राष्ट्रीय कार्याध्यक्ष, राहुल उके (महाराष्ट्र) - राष्ट्रीय उपाध्यक्ष,रविंद्र यादव (उत्तर प्रदेश) - राष्ट्रीय सचिव, मुकेश सकीया (गुजरात) - महासचिव, प्रमोद सांगोले (महाराष्ट्र) - महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष

# येडशी येथे रेडिमेंन्ड गारमेन्ट डिझायनिंग प्रशिक्षण कार्यक्रम आयोजन



येडशी (प्रतिनिधी)- येथे जिल्हा उदोग केंद्र आंतर्गत एमसीईडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला आहे या कार्यक्रमाचा औपचारीक उद्‌घाटन झाले.

यावेळी एमसीईडीचे प्रकल्प अधिकारी पांडुरंग मोरे तर प्रमुख पाहुणे व्याख्यातेआशोक चव्हाण.जीसा चव्हाण शिरीष देशपांडे श्री महादेव सस्ते यांनी मार्गदर्शन केले. यावेळी लक्ष्मण दहिवाले.ऑ.योगेश पाटिल,राज कांबळे मार्गदर्शिका स्मीता जोशी यांची उपस्थीती होती तर प्रशिक्षणार्थी म्हणून सायली शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले तर कार्यक्रमाचे व्यवस्थापन जोस्ना धावारे यश देशपांडे यांनी केले.

हे प्रशिक्षण येडशी येथील बुद्ध विहार समाज मंदिर येथे होत आहे.

# मराठा आरक्षण जीआरची केली होळी, ओबीसी समाजाची धाराशिवमध्ये निदर्शने: एकच पर्व, ओबीसी सर्व घोषणांनी दणाणला जिल्हा कचेरी परिसर



धाराशिव (प्रतिनिधी)- शासनाने काढलेल्या अध्यादेशाच्या विरोधात आता ओबीसी प्रवर्गातील समाज आक्रमक झाले आहेत. गुरुवारी धाराशिव जिल्हा कचेरीसमोर एकत्र येत जोरदार निर्दर्शने करून शासनाचा निषेध नोंदवण्यात आला आहे. शासनाने जीआर रद्द करावा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात आली. शासनाने आदेश रद्द न केल्यास ओबीसी मुंबईच्या दिशेने रवाना होतील, असा इशारा ओबीसी आरक्षण बचाव संघर्ष समितीच्यावतीने या वेळी शासनास दिला.

सकल ओबीसी समाजाच्या वतीने गुरुवारी जिल्हा कचेरीसमोर एकत्र येत सकाळी ११.३० वाजता जोरदार निदर्शने केली. त्यानंतर दिवसभर ठिय्या मांडून आंदेलन सुरूच ठेवले होते. शासनाने काढलेल्या हैदराबाद गॅझेटियरचा जीआरच्या प्रतीची होळी करून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलनात ओबीसी संघर्ष समिती राज्य उपाध्यक्ष राजाभाऊ माळी, डॉ. स्नेहा सोनकाटे, रवी कोरे, हरिदास शिंदे आदींसह ओबीसी समाज बांधव सहभागी होते.

मंत्री भुजबळांना फसवले, मोर्चा मंत्रालयावर धडकेल सरकारने मंत्री छगन बुजबळ यांना नाराज केले, त्यांना फसवलं आहे. भुजबळ सांगितील तसे आंदोलन केले जाईल. जीआर रद्द न केल्यास मुंबईत ओबीसींचा मोर्चा मंत्रालयावर धडकेल, असा इशारा या वेळी दिला.

# धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत राहुल वय २९ रा. मुळज ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.०४.०९.२०२५ रोजी १३.१० वा. सु. आपल्या ताब्यातील पे रिक्षा क्र एमएच २३ एक्स ३७९० हा एनएच ६५ रोडवर पोलीस ठाणे उमरगा समोर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना उमरगा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये उमरगा पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

# धाराशिव जिल्ह्यात अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)-.पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली काल गुरुवार दि.०४.०९.२०२५ रोजी अवैध मद्य विरोधी धाराशिव जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत १२ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले २,२५० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव, २७१ लिटर गावठी दारु, देशी विदेशी दारुच्या १३८ सिलबंद बाटल्या वाहनासह असे मद्य जप्त करण्यात आले. सदर जप्त मद्य यांची वाहनासह एकत्रीत किंमत अंदाजे १५,९३,२२५ आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधीत पोलीस ठाण्यात १२ गुन्हे खालीलप्रमाणे नोंदवण्यात आले आहेत. सदरील घटनेची पोलिसाकडून समजलेली माहिती अशह की, १)भुम पोलीस ठाण्याच्या पथकाने ४ ठिकाणी छापे टाकले. आरोपी नामे-हिरा कल्याण नवार, वय ७५वर्षे, रा.कोष्टी गल्ली भुम ता. भुम जि.धाराशिव या ०८.२५ वा. सु. आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ३,५०० किंमतीची ३५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. आरोपी नामे-सुरज लहु पवार, वय २० वर्षे, रा. इंदीरानगर भुम ता.भुम जि. धाराशिव हे ०८.१० वा. सु. आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे १०,५०० किंमतीची ३० लिटर गावठी दारु व १५० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. तर आरोपी नामे-ताई अंकुश पवार, वय ४४ वर्षे, रा. इंदीरानगर भुम ता.भुम जि. धाराशिव या ०९.३० वा. सु. आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ६,००० किंमतीचे १०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. तर आरोपी नामे-संगीता रामा काळे, वय ५१ वर्षे, रा. रविंद्र शाळेजवळ भुम ता. भुम जि. धाराशिव या ०८.४० वा. सु. आपल्या राहत्या पत्र्याचे शेडसमोर अंदाजे ८,००० किंमतीची १०० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले.

२)तामलवाडी पो ठाणेच्या पथकाने २ ठिकाणी छापे टाकले. आरोपी नामे-उमेश पंडित राठोड, वय २२ वर्षे, रा. खडकी तांडा ता. तुळजापूर जि. धाराशिव हे १३.२० वा. सु. बंडु टिकाराम जाधव यांचे शेतगट नं ९५ मध्ये खडकी तांडा येथे अंदाजे १,०२,००० किंमतीचे २,००० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. आरोपी नामे-अनिल नागनाथ शिंदे, वय २६ वर्षे, रा. देवकुरुळी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे १५.०० वा. सु. देवकुरुळी येथील हॉटेल शिंदे सरकारच्या बाजूला मोकळ्या जागेत अंदाजे ९४५ किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २७ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या.

३)वाशी पो ठाणेच्या पथकाने २ ठिकाणी छापे टाकले. आरोपी नामे-दादाराव शिवाजी नाईकवाडे, वय २७ वर्षे, रा.सुलतानपुर ता.जि.बीड व सुनिल रामराव नाइकवाडे, फुलचंद कल्याण चव्हाण, सत्याम श्रीराम झोडगे, वय २७, मयुर भाउसाहेब झोडगे वय २७ वर्षे रा. कानडीघट ता. जि. बीड यांनी २२.३० वा. सु.राष्ट्रीय महामार्ग क्र ५२ रोडवर यशवंडी पाटीजवळ अंदाजे १२,०३,२०० किंमतीचे विना नंबर स्कार्पीओ सह देशी विदेशी दारुच्या १६ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. आरोपी नामे-सुरज विकास शिंदे, वय ३५ वर्षे, रा. घोडकी ता. वाशी जि. धाराशिव हे १४.१० वा. सु.हॉटेल स्वराजच्या पाईमागील बाजूस पिंपळगाव लिंगी शिवारातील दळवेवाडी घोडकी चौकात अंदाजे १,०४० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १३ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या.

४)धाराशिव शहर पो ठाणेच्या पथकाने २ ठिकाणी छापे टाकले. आरोपी नामे-देवराव गंगाराम काळे, वय ४८ वर्षे, रा.भोसले हायस्कुल समोर पारधी पिढी तांबरी विभाग धाराशिव ता. जि. धाराशिव हे १२.३० वा. सु.पारधी पिढी भोसले हायस्कुल समोर तांबरी विभाग धाराशिव अंदाजे ५,२४० किंमतीचे देशी विदेशी दारुच्या १६ सिलबंद बाटल्या व ४६ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. आरोपी नामे-नंदा रमेश पवार, वय ४८ वर्षे, रा. भोसले हायस्कुल समोर पारधी पिढी तांबरी विभाग धाराशिव ता. जि. धाराशिव हे ११.०० वा. सु.पारधी पिढी भोसले हायस्कुल समोर तांबरी विभाग धाराशिव येथे अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.

५)कळंब पो ठाणेच्या पथकाने १ ठिकाणी छापा टाकला. आरोपी नामे-अविदा शंकर रणदिवे, वय ६२ वर्षे, रा.आडसुळवाडी ता. कळंब जि. धाराशिव या १४.४५ वा. सु. आपल्या राहत्या घराचे बाजूस अंदाजे २,००० किंमतीची २० लिटश्र गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.

६)धाराशिव ग्रामीण पो ठाणेच्या पथकाने १ ठिकाणी छापा टाकला. आरोपी नामे-मयुर राजेंद्र मडके, वय २८ वर्षे,रा. मोहा ता. कळंब जि. धाराशिव हे ०४.०० वा. सु. समाधान हॉटेलच्या दक्षिणेस एन एच ५२ रोडवर ब्रिजवर येडशी शिवार येथे अंदाजे २,५०,००० किंमतीचे देशी विदेशी दारुच्या ६६ सिलबंद बाटल्या सह कार क्र एमएच १२ एन एक्स ०४६१ अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या.

# पावसामुळे गर्दी ओसरली, दर्शन १० मिनिटांवर

तुळजापूर(प्रतिनिधी)-सततच्या पावसामुळे तीर्थक्षेत्र तुळजापुरात भाविकांची गर्दी ओसरली आहे. मंदिरात भाविकांअभावी दर्शन रांगा रिकाम्या असल्याने शुक्रवारी गर्दीच्या दिवशी केवळ १० ते २० मिनिटात धर्मदर्शन होत होते. एरव्ही तीन तास धर्मदर्शनाला लागतात. ते केवळ दहा मिनिटातं होत होते. दरम्यान पावसामुळे रस्ते भाविकांअभावी निर्मनुष्य दिसत होते. भाविकाअभावी मंदिरात तुरळक गर्दी असून शुक्रवारी दर्शन रांगा रिकाम्या होत्या. भाविकांअभावी दर्शन रांगा रिकाम्या असल्याने शुक्रवारी केवळ १० मिनिटात धर्मदर्शन दर्शन होत होते. तर शुक्रवारी दिवसभर मुख दर्शन तसेच सशुल्क दर्शन रांगा रीकाम्या होत्या. एरव्ही शुक्रवारी धर्म दर्शनाला तीन तास तर मुख दर्शनाला एक तास व सशुल्क दर्शनाला दोन तास वेळ लागत असतो.

**लातूर समाचार उस्मानाबाद**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**

## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्हाचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649